नोव्हेंबर, २०२५

# आपलं मंत्रालय

एक सुसंवाद



कृषी कल्याण कर्तव्यम्

कृषी विभाग, महाराष्ट्र शासन

॥ शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी ॥

# अंतरंग

## ६ प्रशासकीय योगायोग : प्रशासनाची स्टील फ्रेम आणि तिचे अंतरंग

काही घटित, काही अघटित हे विधान प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर सहज लागू होते. शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या सरकारी यंत्रणेची चौकट म्हणजेच प्रशासन, जिथे नियम, आदेश आणि फाईलसंचालन हा केवळ प्रारंभिक पाया आहे.

## ८ छत्रपती शाहू महाराज लोक कल्याणकारी राजा!

छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून रोजी झाला. शाहू महाराजांनी त्यांच्या संपूर्ण जीवन कार्यात लोककल्याणाचे व समाज उद्धाराचे कार्य केले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना लोककल्याणकारी राजा असे संबोधले जाते. महाराष्ट्र शासनामार्फत त्यांचा जन्मदिन हा संपूर्ण राज्यात सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. शाहू महाराज यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक कार्याची माहिती घेतल्यानंतर त्यांना लोक कल्याणकारी राजा का म्हटले जाते, याची प्रचिती येते.

## २१ अद्‌भुत खगोलशास्त्रीय प्रकाशपर्व



खिद्रापूर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील एक छोटेसे गाव. खिद्रापूर म्हणजे अध्यात्म आणि मानवी सौंदर्याच्या मिलापावर लिहिलेली दगडातील कोरीव कविता आहे. खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी एक अद्‌भुत घटना घडते. चंद्रप्रकाशाचा वर्तुळाकार कवडसा स्वर्गमंडपातील वर्तुळाकार झरोक्यामधून जमिनीवरील चंद्रशिलेसोबत तंतोतंत जुळतो. संपूर्ण भारतात हे प्रकाशपर्व प्रसिद्ध आहे.

## २४ स्वप्नांना पंख : सोनाली देसाई यांची यशोगाथा

समाजात महिलावर्ग प्रत्येक क्षेत्रात ठसा उमटवत आहे. व्यवसायाच्या क्षेत्रातही महिलांनी मोठ्या धैर्याने, मेहनतीने आणि आत्मविश्वासाने उत्तुंग भरारी घेतली आहे. अशीच एक प्रेरणादायी कहाणी आहे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील सोनाली देसाई–मसूरकर यांची.

## २९ टायटॅनिकमधून प्रवास करताना...

नॉर्थदन आयलडची राजधानी असलेल्या बेलफास्ट शहरातील शिपयार्ड म्हणजे टायटॅनिक जहाजाची जन्मभूमी. तिथेच परिकथेतील जहाजासारख्या सुंदर आणि विशाल टायटॅनिक जहाजाची निर्मिती करण्यात आली होती. टायटॅनिकच्या दुर्घटनेनंतर आता तिथे फार मोठे आणि प्रचंड असे टायटॅनिक म्युझिअम उभारण्यात आले आहे.

## ३५ नव्या आशेच्या दिशेने...

राज्यातील बालके ही राष्ट्राची भावी पिढी असून, त्यांच्या सर्वांगीण विकासावरच देशाच्या प्रगतीचा पाया दृढ होतो. तसेच महिलांच्या प्रगतीच्या आलेखावरून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र उमटते. राज्यातील प्रत्येक घटकातील महिला व बालकांच्या संरक्षणासाठी, सक्षमीकरणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी व पुनर्वसनात्मक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.


| | |
|---|---|
| प्रशासकीय योगायोग : प्रशासनाची स्टील फ्रेम आणि तिचे अंतरंग | ६ |
| महाराष्ट्राची पैठणी | ७ |
| छत्रपती शाहू महाराज लोक कल्याणकारी राजा! | ८ |
| सुखदु:ख | ९ |
| अनेक कथानायकांचा असीरगड! | १० |
| धर हँडल मार पेडल | ११ |
| देवनागरी सुलेखन भाग–५ | १३ |
| कविता | १४–१५ |
| माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | १६ |
| कोस्टल कर्नाटक व श्रृंगेरी मठ ट्रीप | १७ |
| अद्‌भुत खगोलशास्त्रीय प्रकाशपर्व | २१ |
| आम्ही आयुष्यात काय Achieve केलं? | २२ |
| बच्चनजी आणि मी | २३ |
| स्वप्नांना पंख : सोनाली देसाई यांची यशोगाथा | २४ |
| कोल्हापूर चित्रनगरी विकासाच्या वाटेवर | २५ |
| ससा जिंकतोच आणि कासव हरतं? | २७ |
| टायटॅनिकमधून प्रवास करताना... | २९ |
| माझ्या पुस्तकप्रेमाची गोष्ट | ३१ |
| नव्या आशेच्या दिशेने... | ३५ |
| विजयनगर – हम्पी | ३६ |
| सांस्कृतिक ठेवा / जुन्या म्हणी / संस्कृत सुभाषित | ३७ |
| म्हणजे काय? | ३८ |

वर्ष ३ रे । अंक ८ । नोव्हेंबर २०२५

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजते

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — किशोर गांगुर्डे
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — वृंदावन एंटरप्रायजेस प्रा. लि., सिडको बसस्टॉप, ठाणे (प.)

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

## वंदे मातरम् गीताचा १५० वर्षांचा सोहळा

# महाराष्ट्राचा स्वरमहोत्सव



सकाळची हवा मंद गारव्याने भरलेली होती. आकाशात प्रकाशाचा लालिमा पसरलेला आणि महाराष्ट्रभर 'वंदे मातरम्'चा नाद गुंजत होता. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी, वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण राज्यात सार्थ शताब्दी महोत्सव साजरा झाला.

या उपक्रमात राज्यातील ३५८ तालुक्यांमध्ये एकाच वेळी सामूहिक गायन झाले. शाळा, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि कौशल्य केंद्रांतील विद्यार्थी, शिक्षक, नागरिक आणि अधिकारी सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्या क्षणी महाराष्ट्र जणू एका सुरात न्हाऊन गेला. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अभिमान, उत्साह आणि मातृभूमीप्रति प्रेम स्पष्ट दिसत होते.

हा सोहळा फक्त सांस्कृतिक नव्हता, तर राष्ट्रभक्तीचे आणि नवभारताच्या उभारणीचे प्रतीक होता. कौशल्य आणि संस्कृती यांचा संगम, युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची जाणीव आणि मातृभूमीप्रति असलेले प्रेम या सर्वांचा अनुभव त्यातून मिळाला.

वंदे मातरम् हे गीत इतिहासाचा भाग असताना आजही आपल्या वर्तमानाची प्रेरणा आहे. स्वातंत्र्यसंग्रामात लोकांना जो स्फूर्तिदायक नाद दिला, तोच आजच्या नव्या पिढीसाठी उमेदीचा, प्रेरणादायी आणि आत्मविश्वास निर्माण करणारा आहे.

संध्याकाळी सूर्य मावळला; पण सकाळी उमटलेले स्वर अजूनही प्रत्येक हृदयात दुमदुमत होते. 'वंदे मातरम्' हे गीत फक्त शब्द नसून, मातृभूमीच्या चरणी निष्ठा, अभिमान आणि आत्म्याचा एक स्वर आहे.

*वंदे मातरम्! भारतमातेचा जयघोष सदैव दुमदुमत राहो.*

# विचारांचा मंच

मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांना आपले विचार, अनुभव, जाणिवा आणि कार्याचे दर्शन घडवण्यासाठी 'आपलं मंत्रालय' हे मासिक एक प्रभावी आणि सृजनशील व्यासपीठ ठरले आहे. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाने या उपक्रमाच्या माध्यमातून मंत्रालयातील कर्मचाऱ्यांना स्वतःला अभिव्यक्त करण्याची, आपले विचार शेअर करण्याची आणि परस्पर संवाद वाढविण्याची संधी दिली आहे. शासन यंत्रणेत कार्यरत असलेल्या असंख्य अधिकारी–कर्मचाऱ्यांकडे अनेक प्रेरणादायी अनुभव आणि कहाण्या असतात; परंतु त्यांना मांडण्यासाठी योग्य व्यासपीठाची कमतरता जाणवते. ही उणीव 'आपलं मंत्रालय' मासिकाने यशस्वीरीत्या भरून काढली आहे.

दररोजच्या कामकाजाच्या धावपळीत आपल्याला फक्त कार्याशी निगडित संपर्क राहतो; मात्र या मासिकामुळे मंत्रालयातील विविध विभागांतील अधिकारी आणि कर्मचारी एकमेकांच्या कार्याशी, विचारांशी आणि संवेदनांशी जोडले जातात. हे मासिक केवळ माहिती देणारे किंवा सरकारी उपक्रमांची नोंद ठेवणारे नसून ते मंत्रालयातील जीवनशैली, सर्जनशीलता आणि विचारांची देवाणघेवाण घडवणारे माध्यम बनले आहे. म्हणूनच हे मासिक 'मंत्रालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याचा आवाज' ठरले आहे.

या मासिकात विविध विषयांना स्पर्श करणारे अनेक दर्जेदार लेख वाचायला मिळतात. 'प्रशासनाची स्टिल फ्रेम' आणि 'प्रशासनातील अंतरंग' या लेखांतून प्रशासनातील कामकाजाचा आतला आवाका समजतो, तर 'सायकल मोहीम' आणि 'कथानायकांचा गड' यांसारखे लेख कर्मचाऱ्यांच्या सामाजिक बांधिलकीचा वेगळा पैलू उलगडतात. 'कॅलिग्राफी मालिका', 'कविता' आणि 'माझ्या पुस्तकाची कथा' अशा सर्जनशील विभागांमुळे लेखनाची ओढ असणाऱ्यांना स्वतःला व्यक्त करण्याची संधी मिळते. 'पर्यटन खिद्रापूर मंदिर' हा लेख पर्यटनप्रेमींना नव्या ठिकाणांची ओळख करून देतो, तर 'स्वप्नांना पंख – सोनाली देसाई यांची यशोगाथा' हा प्रेरणादायी प्रवास प्रत्येक वाचकाला ऊर्जा देतो.

याशिवाय 'कोल्हापूर चित्रानगरी विकासाच्या वाटेवर', 'छत्रपती शाहू महाराज – लोककल्याणकारी राजा', 'महाराष्ट्राची पैठणी' यांसारखे लेख इतिहास, संस्कृती आणि सामाजिक कार्याच्या दिशेने मार्गदर्शन करतात. महिला व बालविकास विभागाने महिलांसाठी राबवलेल्या विविध उपक्रमांवर आधारित लेख स्त्रीशक्तीला सशक्त करण्याचा संदेश देतात.

या सर्व लेखांमधून मंत्रालयातील कार्याचा मानवी चेहरा, संवेदनशीलता, सर्जनशीलता आणि बांधिलकी यांचा सुंदर संगम दिसतो. 'आपलं मंत्रालय' हे मासिक केवळ शासनातील कर्मचाऱ्यांचे विचार मांडणारे साधन नाही, तर त्यांच्या भावना, अनुभव आणि प्रयत्नांना न्याय देणारा, प्रेरणा देणारा मंच आहे.


अखेर 'आपलं मंत्रालय' मासिक मंत्रालयातील कार्यसंस्कृती अधिक सुदृढ करण्याचे आणि अधिकारी–कर्मचारी यांच्यातील एकात्मतेचे प्रतीक म्हणून उभे राहिले आहे. 'आपलं मंत्रालय' म्हणजे केवळ एक मासिक नव्हे, तर मंत्रालयाच्या आत्म्याचे, विचारांचे आणि कर्मयोगी भावनेचे सजीव रूप आहे.

हा अंक आपणांस नक्कीच आवडेल, अशी खात्री आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

# प्रशासकीय योगायोग : प्रशासनाची स्टील फ्रेम आणि तिचे अंतरंग

**शेखर गायकवाड**




काही घटित, काही अघटित हे विधान प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर सहज लागू होते. शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या सरकारी यंत्रणेची चौकट म्हणजेच प्रशासन, जिथे नियम, आदेश आणि फाईलसंचालन हा केवळ प्रारंभिक पाया आहे. तथापि, या स्टील फ्रेमच्या आत नेमकं काय चालतं आणि कसं चालतं, याचं सम्यक आकलन सरकारी कचेऱ्यांमध्ये रोज नियमानं काम करणाऱ्यालाही नेहमी सहज होत नाही.

सामान्य नागरिकांसाठी हे प्रश्न अधिक जटिल वाटतात: सरकार म्हणजे नक्की काय? किंवा ही यंत्रणा आपल्या दिवसेंदिवसच्या जीवनाशी कशी जोडलेली आहे? सरळ–सोपं उत्तर देता येत नाही; कारण या स्टील फ्रेमच्या पलीकडे एक विशाल आणि बहुस्तरीय जग कार्यरत असतं. यात साहेब, अधिकारी, अधीक्षक, क्लार्क, शिपाई आणि कार्यालयीन कर्मचारी यांचं सामूहिक कार्य आणि परस्परसंबंध हे व्यवस्थेचे खांब आहेत.

या यंत्रणेच्या आत बदल्या, प्रमोशन, उद्घाटन, फाईलींचा गोंधळ, निवडणुकीची तयारी, आदेशांचे पालन, पत्रव्यवहार, कर्मचारी वर्तन आणि कार्यालयीन निर्णयांची गुंतागुंत सतत घडत असते. याच प्रक्रियेत अनेक योगायोग निर्माण होतात, जे कधी प्रशासनाच्या कार्यपद्धतीला गती देतात, तर कधी अडथळा निर्माण करतात. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा टिकवताना ही स्टील फ्रेम अनेकदा अनाकलनीय; पण महत्त्वपूर्ण परिणाम घडवते.

या यंत्रणेतील घटनांचा अभ्यास करताना आपल्याला विरोधाभास, गमतीजमती, हलक्या फुलक्या विनोदाने हसवणारे प्रसंग आणि गंभीर निर्णय घेण्याची प्रक्रिया स्पष्टपणे दिसते. हे पुस्तक प्रशासनाच्या अंतरंगाचे विहंगम दर्शन घडवते. फाईलींच्या चक्रापासून निर्णय प्रक्रियेपर्यंत, आदेशांची पूर्तता, कर्मचारी वर्तन, योगायोग आणि विरोधाभास – या सर्व बाबींचा अभ्यास करूनच प्रशासनाची खरी चाल समजून येते.

थोडक्यात, शासनाची स्टील फ्रेम फक्त कार्यालयीन यंत्रणा नाही, तर तिच्या आत चालणारी जीवनशैली, कामकाजाची लय, नियम आणि मानवी संवाद यांचा संगम आहे. प्रशासनाच्या कार्यपद्धतीला समजून घेण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक नागरिकासाठी आणि अभ्यासकासाठी हे पुस्तक अनिवार्य वाचन ठरते..

**(निवृत्त आयएएस अधिकारी)**



# महाराष्ट्राची पैठणी

प्रशांत साजणीकर

Sir, this is India's first Paithani Covered Mega Photo Album Roocheer Bhagat मला अभिमानाने सांगत होता. माझ्या समोरच्या टेबलवर एक भला मोठा फोटो अल्बम ठेवलेला होता. त्याचे ते दिमाखदार पैठणी कव्हर पाहूनच मी आश्चर्यचकित झालो होतो.

पैठणी आवडत नाही, अशी स्त्री महाराष्ट्रात तरी सापडणे कठीण, परंतु पैठणी महावस्त्राचा असा अभिनव वापर करण्याच्या कल्पनेला दाद द्यायला हवी.

रुचिर कलात्मक दृष्टिकोन असलेला व्यावसायिक फोटोग्राफर आहे. त्याने काढलेले महाराष्ट्रातील विविध धरणांचे फोटो अगदी पाहण्यासारखे आहेत. रुचिर मूळचा पैठणचा. पैठणच्या या ऐतिहासिक समृद्ध वारशाचा त्याला सार्थ अभिमान आहे. समस्त स्त्रीवर्गाची अत्यंत लाडकी असलेली पैठणी मूळची पैठणचीच. याच पैठणीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी रुचिरने अभिनव कल्पना राबविली.

निमित्त झाले ते एका गृहप्रवेश समारंभाचे. या कार्यक्रमाचा अल्बम तयार करायचा आणि तोही पैठणीच्या वेष्टनात बांधलेला. त्याचा आकारही भला मोठा. म्हणजे उघडल्यावर दोन फूट रुंद आणि पाच फूट लांब इतका मोठा हा अल्बम दिसतो. त्याचे वजनच २४ किलो आहे. असा अल्बम तयार करायचा हेच मोठे आव्हान होते.

पैठणीचा एक विशिष्ट तानाबाणा असतो. त्या मापातच धागे विणले जातात. यामुळे या अल्बमसाठी छोटा तुकडा तयार! दोन फूट रुंद आणि पाच फूट लांब इतका मोठा हा अल्बम दिसतो. त्याचे वजनच २४ किलो आहे. असा अल्बम तयार करायचा हेच मोठे आव्हान होते.

पैठणीचा एक विशिष्ट तानाबाणा असतो. त्या मापातच धागे विणले जातात. यामुळे या अल्बमसाठी छोटा तुकडा तयार करणे हे कठीण काम होते. ते करायला कोणी कारागीर तयार नव्हता. रुचिरने एका कारागिराकडून ते काम करवून घेतले. या अल्बमसाठी वापरला जाणारा कागदही परदेशातून मागवला आहे. तो कागद बनवणारी कंपनी पाचशेपेक्षा जास्त वर्षे जुनी आहे आणि या कागदाचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे या फोटोवर प्रकाश टाकल्यास ती चित्रे अधिकच चमकदार दिसतात आणि साडीचा पदर किंवा दागिने जणूकाही त्रिमितीय आहेत, असे दिसू लागतात.

अल्बम देखणा झालाय. पैठणीचा अशा प्रकारे केलेला भारतातला हा पहिलाच प्रयोग आहे. बदलत आणि लुप्त होत चाललेल्या महाराष्ट्राच्या कलांना पर्यायी व्यासपीठ मिळावे, यासाठी रुचिरचा हा छोटासा प्रयत्न. या अल्बमला अनेक ठिकाणी प्रदर्शनात सहभागी होण्याचे भाग्य लाभले आहे आणि उदंड कौतुकही झाले आहे. महाराष्ट्राची पैठणी या रूपानेही अनेक ठिकाणी पोहोचतेय हे विशेष. रुचिरचे यासाठी कौतुक आणि शुभेच्छा.

**(सहसचिव व सहव्यवस्थापकीय संचालक, फिल्मसिटी, मुंबई.)**

# छत्रपती शाहू महाराज लोक कल्याणकारी राजा!

सुनील सोनटक्के

छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून रोजी झाला. शाहू महाराजांनी त्यांच्या संपूर्ण जीवनकार्यात लोककल्याणाचे व समाज उद्धाराचे कार्य केले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना लोककल्याणकारी राजा असे संबोधले जाते. महाराष्ट्र शासनामार्फत त्यांचा जन्मदिन हा संपूर्ण राज्यात सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. शाहू महाराज यांनी केलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक कार्याची माहिती घेतल्यानंतर त्यांना लोक कल्याणकारी राजा का म्हटले जाते, याची प्रचिती येते.



छत्रपती शाहू महाराज यांचे मूळ नाव यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दाम्पत्याच्या पोटी झाला. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले (१७ मार्च १८८४).

छत्रपती शाहू महाराज यांच्यावर महात्मा फुले व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव होता. छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार होते. सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला आवश्यकता आहे, असे सांगून त्यांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणासाठी सवलती जाहीर केल्या. महाराष्ट्राने छत्रपती शाहू महाराज यांचा शेतकऱ्यांचा खरा राजा म्हणून गौरव केला. भारतातील वसतिगृहाचे आद्यजनक म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा गौरव केला जातो. ते कल्याणकारी राजा होते. एप्रिल १९१९ भारतात बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य करणाऱ्या अखिल भारतवर्षीय क्षत्रिय महासभा या संस्थेच्या कानपूर येथे भरलेल्या १३ व्या अधिवेशनात शाहू महाराज यांना त्यांच्या कार्याबद्दल राजर्षी ही पदवी बहाल करण्यात आली.

ग्रामीण भागातून शहरी भागात शिकण्यास येणाऱ्या विविध जाती-धर्माच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जातीची वसतिगृह स्थापना शाहू महाराज यांनी केली, तर सन १९०१ मध्ये मराठा विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगची स्थापना कोल्हापूर येथे केली, तर नाशिक येथे उदोजी विद्यार्थी वसतिगृह उभारून शहरी भागात विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केल्याने त्या गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले.

सन १९०२ मध्ये शाहू महाराज यांनी राज्यातील मागासवर्गीयांसाठी प्रशासकीय सेवांमध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. तसेच महाराजांनी १५ नोव्हेंबर १९०६ किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सन १९०७ मध्ये मिस क्लार्क बोर्डिंग हाऊसची स्थापना अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी करून त्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. सन १९११ मध्ये कोल्हापूर संस्थानात जाहीरनामा काढून त्यानुसार १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा करून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली केली.

शाहू महाराज यांनी १९११ मध्ये शिक्षक प्रशिक्षण व शिक्षकांसाठी मेरीट प्रमोशन योजना राबवली, तर १९१७ मध्ये आदेश काढून माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. कोल्हापूर संस्थानातील गोरगरीब घरातील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. १४ फेब्रुवारी १९१९ पाटील शाळा व त्याला जोडून तलाठीवर्ग सुरू करण्याचा जाहीरनामा काढला.

बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून शाहूंनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षणावर या संस्थानात होणारा खर्च मोठा होता.

लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल सुरू केले व पुणे येथे श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, तर जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना करून शाहू महाराज यांनी तांत्रिक शिक्षणाला महत्त्व देण्याबरोबरच लष्करी शिक्षणाची दारे खुली केली.

शाहू महाराज यांनी सन १९१७ मध्ये विधवा विवाहाचा कायदा करून पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली, तर १९१८ मध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला व समाजातील अनिष्ट चाली-रीतींवर हल्ला चढवला. १९१८ मध्ये महार वतने रद्द करून जमिनी रयतवारीने करून दिल्या व वेठबिगारी प्रथा कायद्याने बंद केली व १९२० मध्ये माणगाव अस्पृश्यता निवारण परिषदेचे आयोजन केले.

छत्रपती शाहू महाराज यांनी व्यवसाय निर्बंध दूर करून अस्पृश्यांना व्यवसाय स्वातंत्र्य दिले. जातिभेदास तीव्र विरोध केला. महाराजांच्या या सर्व लोक कल्याणकारी कार्यामुळे खरेखुरे लोककल्याणकारी राजा होते. पददलित व मागासवर्गीयांची उन्नती हेच छत्रपती शाहू महाराज यांनी जीवितकार्य मानले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, अशी घोषणा त्यांनी केली. उदार विचारप्रणालीचा राजा होते. राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर; पण मागासलेल्या प्रजेच्या सेवेचे व्रत सोडणार नाही, असे शाहू महाराज यांनी ठासून सांगितले. कामगारांनो, संघटित व्हा व आपले हक्क प्राप्त करून घ्या, असा संदेश त्यांनी दिला.

He was a king. But democratic king. असे गौरवोद्गार भाई माधवराव बागल यांनी शाहू महाराज यांच्याबद्दल काढले, तर थोर समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे शाहू महाराज यांच्याबद्दल म्हणाले की, शाहू राजा नुसता मराठा नव्हता. ब्रह्मतोतरही नव्हता. तो नव्या युगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा स्वाभाविक तरंग होता.

**(जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.)**


सतीश मोये

# सुखदुःख

सुख आणि दुःख या सापेक्ष संकल्पना. मला जे सुख वाटते, ते दुसऱ्याला सुख वाटत असेलच असे नाही. तसेच दुःखाचेही. मी सुखात आहे पाहून कुणाला दुःख होत असेल, तर मी दुःखात पाहून कुणाला सुख आणि हे पाहून पुन्हा मला दुःख. असंही होत असतं.

बाह्यसुख आपण ज्याला म्हणतो, ते वस्तूंशी निगडित असते. आलिशान फ्लॅट, मोठी बाग, बंगला, गाडी इत्यादी; पण आंतरिक सुख हा खरा सुखाचा अनुभव असतो, जो मनाच्या सुखाकडे बघण्याच्या दृष्टिकोनावर आणि त्यामुळे तयार झालेल्या वृत्तीवर अवलंबून असतो.

आपण अनेकदा म्हणतो, पूर्वीचे दिवस खूप छान होते. चाळीतले छोटेसे घर होते. तुटपुंजा पगार, गाडी नाही, तरीही आपण सुखात होतो. याचे कारण एकच होते की, अजिबात पैसे मोजावे लागत नाहीत किंवा थोडाच पैसा खर्च करावा लागतो, अशा छोट्या-छोट्या गोष्टीत मन सुखायचे... आणि एका क्षणी भोगलेले सुख खूप काळ पुरायचे...



आता मात्र छोट्या-छोट्या गोष्टीत सुख टिपणारा टिपकागदच हरवून गेला आहे आणि जोडीला सुखात राहण्यापेक्षा, सुख भोगण्यापेक्षा ..'मी किती सुखात आहे' हे दाखवण्यात सुख मानायची स्पर्धा लागली आहे. यातलं सुख फसवं आहे, कारण दाखवणारेही आपणच आणि दाखवतो तेवढे आपण सुखात नाही, हे ओळखणारेही आपणच. आपलीच फसवणूक आपणच राजरोसपणे करत आहोत. बाह्य सुखे, त्यासाठीची साधने अमाप आहेत; पण या साधनांनी जे साध्य करायचं, ते आंतरिक सुख, समाधान हरवतंय आणि मग ते शोधण्यासाठी योगा, निसर्गसहली, वेगवेगळे मार्ग, मोठमोठे खर्च...

*सारेच सुख आहे*
*ते आपल्या घरात*
*बाहेर शोधण्या ते*
*परि आपुली वरात*

असं होऊन जातं. त्यातही भरीस भर शेजारच्याशी तुलना करण्याची वृत्ती ही दुःखाचे मूळ ठरते आहे.

एका कवितेत मी म्हटले होते...

*'शेजारच्या घरात*
*दिसतेच सुख जादा*
*सुख असूनि, जीव दुःख कवटाळतो उरात'*

हे शेजारच्या घरात डोकावणेही बंद झाले पाहिजे.

श्रीमंत, उच्च मध्यमवर्गीयांपेक्षा चाळीत, छोट्याशा खोलीत एकत्र राहणारी माणसे तुलनेने बाह्य अडचणी जास्त असूनही आंतरिक सुख जास्त भोगत असतात असे वाटते, कारण सुखाचे मूल्य आणि ते कशात आहे? हे त्यांना अचूक कळलेले असते. आपल्याला ते सुखात दिसत नसतील; पण ते सुखात असतात.

ऐश्वर्याला, समृद्धीला कमी लेखण्याचा हेतू नाही; पण ते किती मिळवायचे? आणि ते मिळविण्यासाठी इतका वेळ द्यायचा का, की सुख भोगायलाच वेळ शिल्लक राहू नये? हा खरा प्रश्न आहे. याची उत्तरे मनाची उमज आणि आपल्या वृत्तीवर अवलंबून आहे. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे सुख-दुःख हे मनाचे खेळ आहेत.

*न खिजामें है कोई तीरगी*
*न बहारमे कोई रौशनी ।*
*ये नजर नजरके चिराग है*
*कही बुझ गये कही जल गये।।*

**– शायर लखनवी**

पानगळ (शिशिर ऋतू) उदासवाणा असतोच असं नाही. तसंच वसंत हा प्रकाशमान असतोच असं नाही, मनाची जशी अवस्था तसे बाहेर ऋतू दिसतात.

तेव्हा मनाची वृत्ती समाधान देणाऱ्या सुखाकडे वळविणे आवश्यक. अप्राप्य गोष्ट मिळेल आणि मग मी सुखी होईन, असं म्हणाल, तर काळ निघून जाईल. प्राप्त आहे त्यात सुख मानून ते भोगून अधिक सुख प्राप्तीचा मार्ग कधीही श्रेयस्कर. खरं सुख कशात आहे, हे प्रत्येकालाच माहिती आहे. खऱ्या सुखाची सुरुवात त्यागातून होते. तो त्यागच कुणाला नको असतो. विषय सुखांची साधने विकत घ्यावी, विषय सुख घ्यावं. एका विषय सुखाचा कंटाळा आला की, दुसरे विषय सुख...बस्स इतकाच सुखाचा खेळ...

*'विषयास देह भोगी*
*आत्मा असे उपाशी*
*विपरीत ही सुखाची व्याख्या आहे भरात'*

कृती आणि परिणाम आपण प्रत्येक जण जाणतोच. प्रश्न प्रयत्नपूर्वक शाश्वत सुखाच्या दिशेने जाण्याचा आहे. अर्थात हे शाश्वत सुख जाणवण्यालाही एक वय यावं लागतं. कुणाचं ते लवकर येतं, तर कुणाचं उशिरा...इतकंच... तोपर्यंत ज्याला-त्याला ज्याच्या-त्याच्या कल्पनेच्या सुखात राहू देणे उत्तम...

*मानीले ना त्यांनी आपणा*
*त्यांचे गुरू*
*शिष्य म्हणुनी का उगा*
*उपदेश सांगा?*

**(निवृत्त सहसचिव, महाराष्ट्र शासन.)**

# अनेक कथानायकांचा असीरगड!

**युवराज विनायकराव पाटील**

*संध्याकाळच्या उन्हाने सोनेरी झालेला आकाशाचा कडा आणि त्या कड्यावर दूरवरून डोकावणारा एक गड – नाव आहे असीरगड.*

*मध्यप्रदेशच्या सीमेलगत, जळगाव जिल्ह्याला लागून असलेला बुऱ्हाणपूरजवळचा हा गड म्हणजे केवळ एक किल्ला नाही. तो आहे, शतकानुशतकांची साक्ष देणारा, पण विस्मृतीत हरवलेला इतिहासाचा एक धीरगंभीर दस्तऐवज.*



एकदा सुट्टीच्या निमित्ताने बुऱ्हाणपूरला गेलो होतो. परतीच्या वाटेवर, संध्याकाळी पाचच्या सुमारास रस्त्याच्या कडेला एक लहानसा फाटा दिसला – 'असरगढ किल्ला'. उत्सुकतेने डोळे विस्फारले गेले. थोडं पुढे जाताच तो गड नजरेला पडला. सूर्याच्या झळाळत्या किरणांमध्ये स्नान करत, विंध्य–सातपुडा डोंगररांगेत अंग चोरून बसलेला. घड्याळाकडे पाहिलं आणि हळहळ वाटली.


या गडासाठी एखादा संध्याकाळचा तास राखून ठेवायला हवा होता, मनात आलं; पण वेळेचं बंधन आणि जळगावला रात्रीपर्यंत पोहोचण्याची गरज. त्यामुळे गडाच्या पायथ्याशी थांबूनच पुढे निघालो.

## इतिहासाच्या पावलांची घरघर...

असीरगड म्हणजे एका महायोद्ध्याच्या पावलांचा आरंभबिंदू. 'छावा' चित्रपटाची सुरुवात जिथून होते, छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाची गाथा जिथं सुरू होते, तोच हा गड. त्याकाळच्या बलाढ्य सत्ताधीशांपुढे मराठ्यांच्या आक्रमकतेची झलक या गडावरूनच दाखवली गेली होती.

विंध्य आणि सातपुड्याच्या कुशीत विसावलेला असीरगड, भौगोलिकदृष्ट्या एक महत्त्वाची जागा. एकेकाळी इथूनच 'दक्षिण पथ' सुरू व्हायचा. दक्षिणेकडून दिल्लीकडे जाणारा हा एकमेव सुरक्षित मार्ग. त्यामुळे दिल्लीकडे वाटचाल करणाऱ्या अनेक साम्राज्यांनी या गडाच्या पायथ्याशी आपली छावणी उभी केली होती.







## अहीरांचे वैभव आणि अहिराणीची साक्ष...

इतिहास संशोधक सांगतात, असीरगड हे अहीर राजांचे राजधानीचे ठिकाण होते. नंदा, वीरसेन, गोवाजी, लक्ष्मीदेव, कान्हदेव यांसारखे दूरदृष्टी शासक येथे होऊन गेले. गडाचं स्थान केवळ सामरिक नव्हे, तर व्यापारी दृष्टिकोनातूनही अत्यंत मोलाचे होते.

आज जळगाव, नंदुरबार, धुळे या जिल्ह्यांमध्ये ऐकू येणारी अहिराणी बोली भाषा, हीच ती परंपरेची ओळख. जिथे विशिष्ट बोली भाषा टिकून आहे, तिथे त्या समाजाच्या खोल मुळांची साक्ष मिळते. असीरगड आणि अहिराणी ही केवळ भाषा आणि जागा नाहीत. त्या एकमेकांशी जोडलेल्या अस्मितेच्या गाथा आहेत.

## अश्वथामाचे सावट?

महाभारताचा अजरामर योद्धा अश्वथामा. त्याच्याशी संबंधित एक दंतकथा आजही या गडावर जिवंत आहे. संध्याकाळच्या वेळेस जेव्हा संपूर्ण जग शांत होते, तेव्हा कुणीतरी गडावर त्याच्या हालचाली पाहिल्याचा दावा करतो; पण अशा आख्यायिका गडाला एक वेगळेच रसरसते रूप देतात. परवा आमचे स्नेही आणि आमचे वरिष्ठ अधिकारी डॉ. किरण मोघे यांच्या चिरंजीव समर यांनी धर्म नावाची अत्यंत दर्जेदार कादंबरी लिहिली आहे. त्यात अश्वथामाचे पात्र आणि त्याच्या वाट्याला आलेल्या द्वापारयुगातील घटना कलियुगात तो बोलून दाखवतोय.. ते वाचताना मला तो असीरगडावर फिरतानाचा फिल आला.

## विस्मरणात गेलेली शौर्यगाथा...

असीरगडाने अनेक लढाया पाहिल्या. मुघलांच्या क्रूर कथा आणि मराठ्यांच्या शौर्याच्या गाथा. या साऱ्यांचे साक्षीदार असलेली ही वास्तू आज शांत आहे. फारच कमी संशोधन, दुर्लक्षित पर्यटन आणि इतिहासाच्या पायथ्याशी पडलेली विस्मृतीची सावली. हे गडाचं आजचं वास्तव.

## पुन्हा भेटू...

पुन्हा कधी वेळ मिळाला, तर गडाच्या पायऱ्या चढून तटबंदीवर उभे राहायचे आहे. तिथून विंध्य–सातपुड्याच्या दरम्यानचा इतिहास डोळ्यांमध्ये साठवायचा आहे. डोळ्यांसमोरून जाणारी साम्राज्य, दरबार, सैन्याच्या हालचाली, व्यापाराच्या गती आणि हे सारे अनुभवताना हृदयात एकच भावना. हे ठिकाण आपण विसरलो होतो कसं?

**(जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.)**

# धर हँडल मार पेडल

**डॉ. विजय मोरे**

***(काश्मीर ते कन्याकुमारी सायकल मोहीम)***

आम्ही शाळेतील ५-६ मित्र आपल्या व्यस्त दिनचर्येतून वर्षातून १-२ ट्रेकिंग/सायकलिंग/बुलेट रायडींग मोहिमा करत असतो. त्यावेळी काश्मीर ते कन्याकुमारी सायकल मोहीम करण्याची आमची नेहमी चर्चा होत होती. त्यातूनच प्रेरित होऊन मी, प्रसाद आणि प्रदीप या तिघा शालेय मित्रांचा K2K करायचेच या नावाचा व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केला. K2K (काश्मीर ते कन्याकुमारी) साठी आवश्यक माहिती गोळा केली. मोहिमेची तारीख निश्चित केली आणि त्याच दरम्यान प्रदीपने काही कारणास्तव प्लॅन कॅन्सल केला. तरीदेखील खचून न जाता आम्ही दोघांनी (मी आणि प्रसादने) सीमोल्लंघन करायचे ठरवले. दोघांनी आपापल्या कार्यालय प्रमुखांकडे रजेसाठी अर्ज केला आणि मला विनासायास तर प्रसादला थोड्या कष्टानंतर रजा मंजूर झाली. वेळ कमी राहिला असल्याने याद्या करून नवीन सायकलसह सर्व साहित्याची जमवाजमव केली. त्यानुसार सर्व नियोजन करून ठरल्याप्रमाणे मुंबई ते श्रीनगर विमान तिकीट बुक केले. सायकल विमानातून बॉक्स पॅक करून १४ ऑक्टोबर २०२४ला आम्ही दोघांनी विमानासोबत टेकऑफ केले. आता खऱ्या अर्थाने मोहिमेला सुरुवात झाली होती. मनात थोडी हूरहूर ठेवून त्या रात्री शांत झोपलो.

श्रीनगरला पोहोचल्यावर दुसऱ्या दिवशी सायकल दुकानातील गुल्फामकडे सायकल असेंम्बल करायला दिली. गुल्फानेदेखील आमच्या सायकली निरपेक्ष भावनेने असेंम्बल करून दिल्या. दुपारी साधारणतः १२.३० वाजता लाल चौक, श्रीनगर येथून मोहिमेचा श्रीगणेशा केला. दोन जोडी कपडे आणि सायकल दुरुस्तीचे आवश्यक सामान एवढेच साहित्य पाठीवरील बॅगमध्ये घेऊन प्रवासाला सुरुवात केली. श्रीनगरचे सौंदर्य बघत-बघत हळूहळू पेडल मारत होतो. पहिल्याच दिवशी सुमारे १० किमी लांब असलेला बनीहाल बोगदा पार करण्याचा थरार अनुभवला. सायंकाळी राष्ट्रीय महामार्ग ४४ लगतच्या हॉटेलमध्ये मुक्काम केला. सुरुवातीपासून शेवटपर्यंत आम्ही महामार्गानजीकच राहण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दुसऱ्या दिवशी प्रवासाला लवकर सुरुवात करणे शक्य झाले.



क्लॉक टॉवर, लाल चौक, श्रीनगर.

दुसऱ्या दिवशी बोचऱ्या थंडीत प्रवास सुरू केला. आज प्रवासात फक्त उतारच होता. त्यामुळे थंडीचा कडाका चांगलाच जाणवत होता. एका बाजूला उंच डोंगर, एका बाजूला खोल दरी आणि रस्त्यात ट्रकच्या लांबच लांब रांगा चुकवत आमचा प्रवास सुरू होता. मजल दरमजल करत जम्मू आणि पंजाबच्या सीमेवर पोहोचलो. जालंधरमध्ये तेथील लोकल सायकलस्वारांनी आमचे स्वागत केले. त्यांच्यासोबत चहा, नाश्ता करून आम्ही पुढच्या प्रवासाला सुरुवात केली.

दिवसभराच्या प्रवासानंतर रात्री गरम पाण्याने अंघोळ करून कपडे धुणे आणि सकाळी तेच कपडे घालून पुढच्या प्रवासाला सुरुवात करणे हीच दिनचर्या ठेवली. दिल्ली-अमृतसर या नवीन रस्त्याचे काम सुरू असल्याने सायकल चालवताना खूप अडथळे येत होते. त्यातून आमची सायकल सफारी सुरू होती. रस्त्याच्या दुतर्फा गव्हाची लांबच लांब शेती पसरली होती. जालंदर-लुधियाना करत करत सुमारे १२५ किमीचा प्रवास करून मंडी गोविंदगड येथे मुक्कामाला थांबलो. सहाव्या दिवशी पहिल्यांदा सायकल पंक्चर झाली. सुरुवातीला पंक्चर काढणे आमच्यासाठी दिव्य होते; पण हळूहळू ती सवय झाल्याने एखाद्या सायकल पंक्चरवाल्याला मागे टाकू इतके सराईत झालो. पुढे पंजाब-हरियाणा सीमेवर शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे रस्ता बंद होता. त्यामुळे वाट वाकडी करून अक्षरशः off road सायकल चालवावी लागली. या सगळ्यात पुष्कळ वेळ गेल्याने पानिपत येथे राहणाऱ्या शालेय वर्गमित्राच्या घरी पोहोचता आले नाही. आम्ही पोहोचलो नाही; पण आमचा वर्गमित्र आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी हार-तुरे घेऊन भेटायला आला आणि आमचा यथोचित पाहुणचार केला. सातव्या दिवशीच्या प्रवासापूर्वी झालेल्या चर्चेत फरिदाबाद की गाझियाबाद असा गोंधळ झाल्याने एके ठिकाणी आम्ही गाझियाबादकडे वळलो आणि दिल्ली ईस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेस वेवर सायकल चालवू लागलो. तेवढ्यात माझ्या प्रवासावर घारीसारखी नजर ठेवून असलेल्या माझ्या बायकोने फोन करून मला रस्ता चुकल्याची जाणीव करून दिली. मग

आम्ही पुन्हा रस्ता बदलून फरिदाबाद रस्त्याला लागलो, परंतु रस्ता चुकल्यामुळे आमचा बराचसा वेळ वाया गेला. त्यातच दिल्लीत शिरल्यावर तेथील भयंकर ट्रॅफिकला सामोरे जावे लागले. ट्रॅफिक चुकवता–चुकवता दमछाक झाल्याने त्या दिवशी आम्ही दिलवाल्या दिल्लीतच मुक्काम केला. आठव्या दिवशी पहाटेच दिल्लीला रामराम करत श्रीकृष्ण जन्मभूमी मथुरा येथे पोहोचलो. नवव्या दिवशी उत्तर प्रदेशात नाश्ता, राजस्थानमध्ये दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण मध्य प्रदेशात केले. आजच्या १५७ किमीच्या प्रवासात दोन राज्यांच्या सीमा ओलांडल्या. दहाव्या दिवशी सकाळी प्रवास सुरू करून ग्वाल्हेर शहरातून फेरफटका मारत मारत शहर मागे टाकले आणि हायवेला लागलो. अकराव्या बाराव्या दिवशी मध्य प्रदेशातूनच पेडल मारत राहिलो. तेराव्या दिवशी सकाळी लवकर सुरुवात करून नरसिंहपूर, लखनादोन, सिवनीच्या पुढे कुराई येथे मुक्काम केला. आज रस्त्याला भरपूर चढण होती तरीदेखील दिवसाअखेरीस सुमारे १६५ किमी सायकल चालवण्यात यशस्वी ठरलो. त्या दिवशीची राइड आतापर्यंतची सर्वात मोठी ठरली. आता महाराष्ट्राची हद्द जवळ आली, या विचाराने मन सुखावले होते. चौदाव्या दिवशी पेडल मारायला सुरुवात केली आणि साधारण सकाळी ८.३०च्या दरम्यान महाराष्ट्राच्या सीमेवर धडकलो. मोहिमेचा अर्धा टप्पा पूर्ण झाला होता. देशाच्या मध्यावर, संत्रानगरीत प्रवेश केला आणि तिथेच तळ ठोकला. चौदावा व पंधरावा दिवस महाराष्ट्रातच काढला. महाराष्ट्रात मित्रांनी पाहुणचारात कुठेच कमतरता ठेवली नाही. सोळाव्या दिवशी सकाळीच महाराष्ट्र ओलांडून तेलंगणामध्ये प्रवेश केला. मग आदिलाबाद, इचोडा, नेराडीगोंडा, निर्मल ही शहरे मागे टाकत १७० किमीनंतर आरमूर येथे दिवस संपवला. आजचा रस्ता अधिक चढणीचा असला तरी रस्ता चांगला असल्याने आतापर्यंतचे एक दिवसातील सर्वाधिक अंतर कापण्यात आम्ही यशस्वी ठरलो होतो.



सतराव्या दिवशी लवकर सुरुवात केली, कारण आमच्या शालेय वर्ग–मैत्रिणीच्या घरी डिनरचा प्लॅन होता. आजही रस्ता चढणीचा आणि खूप थकवणारा होता. दुपारचा सूर्य अंगावर येत होता. घामाने आणि तहानेने जीव व्याकूळ होत होता. त्यादिवशी दिवाळीचा पहिला दिवस होता. घरापासून लांब असताना दिवाळीच्या दिवशी मैत्रिणीच्या घरी फराळ करायला मिळाल्याचा आनंद वेगळाच होता. अठराव्या दिवशी प्रवासाला थोडी उशिरा सुरुवात केल्याने हैदराबाद शहर क्रॉस करता–करता तोंडाला दमछाक झाली. सुमारे ५० किलोमीटर अंतर कापल्यानंतर हैदराबाद शहराला खुदा हाफिज केले. एकोणीसाव्या दिवशी पहाटे पाच वाजता सायकलला पेडल मारायला सुरुवात केली. आज नाश्त्यापर्यंतच ६० किमीचा टप्पा पार केला होता. त्यावेळेस काहीतरी वेगळाच जोश संचारला होता. लंचपर्यंत जवळपास १२५ किमी अंतर पूर्ण केले. काहीतरी तुफानी करायचंच हा निर्धार केला आणि एकमेकांना प्रोत्साहित करत–करत सायकल चालवणे सुरू होते. सायंकाळी चहापर्यंत १६० किलोमीटर झाले होते. आता आज २०० किमी पूर्ण करायचा विचार पक्का झाला आणि त्याकरिता वेगाने पेडल मारू लागलो. हळूहळू अंधार पडायला लागला होता; पण २०० किमीचा मॅजिक आकडा काही दिसत नव्हता. शेवटी सायंकाळी ७.४५ च्या दरम्यान २०० किमीचा टप्पा पूर्ण झाला. ही आमच्या प्रवासातील सर्वात मोठी राईड ठरली. विसाव्या दिवशी कालचा जोश कायम ठेवून प्रवासाला सुरुवात केली; पण पंक्चर टायरने आमचीपण हवा घालवली. पेनुकोंडा, बागेपल्ली, चिकबल्लाळपूर, देवनहळ्ळी, होस्कोट मार्गे मालूर गाव गाठले. वाटेत वरूण राजाने हजेरी लावली. आज बंगळूरमध्ये जाणे टाळून बाह्यवळण मार्गाने वेगळा मार्ग निवडला. आजदेखील चढाणे घाम काढला होता. आता हत्ती गेला होता आणि केवळ शेपूट राहिले होते. तेलंगणा सुरू झाल्यापासून सूर्यदेव आमच्यावर विशेष प्रसन्न झाले होते आणि दुपारी ढगाआड लपून राहत होते. त्यामुळे आमच्या गतीसोबतच ऊर्जेत कमतरता येत नव्हती. अंतर झपाझप कमी होत होते. आता ठरवलेल्या वेळेत घरी पोहोचणार याची पक्की खात्री झाल्याने परतीचे तिकीट आरक्षित करून ठेवले. पंचविसावा दिवस उजाडला आणि कन्याकुमारी १९० किमी राहिले होते. पंचविसाव्या दिवशी १७० ते १८० किमी अंतर पार करून केवळ १०–२० किमी अंतर बाकी ठेवून ९ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे सूर्योदयाला कन्याकुमारीत प्रवेश करायचा बेत होता; पण नियतीला हे मान्य नव्हते. आज रस्त्याला विशेष चढ नव्हता आणि सकाळी नाश्त्यापर्यंत सुमारे ६० किमी अंतर पूर्ण केले होते. मग तोच जोश कायम ठेवून आज जेवण न करता सायकल चालवायचा निश्चय केला. पेडल मारत राहिलो. अंतर पटापट कमी होत होते. सायंकाळपर्यंत १८० किमी ठरवलेला टप्पा दुपारीच पार झाला आणि आश्चर्य म्हणजे आम्ही त्यादिवशी १९० किमी पूर्ण करत सायंकाळी ४.३० वाजता कन्याकुमारीत पोहोचलो.

श्रीनगर (काश्मीर) ते कन्याकुमारी हे ३,७१४ किमीचे अंतर २५ दिवसात पार केले होते, यावर विश्वासच बसत नव्हता. दररोज साधारणतः १५० किमी अंतर पार केले होते. दुसऱ्या दिवशी मध्यरात्री आमचे परतीचे विमान पकडून घर गाठले. येताना सायकली रेल्वेने पाठवल्या. साताऱ्यात पोहोचल्यानंतर कुटुंबीय नातेवाईक आणि मित्रमंडळींनी धमाकेदार स्वागत केले. हा सर्व प्रवास विभागातील माझे आदरणीय वरिष्ठ, सहकारी, जिवलग कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रमंडळी यांचे आशीर्वाद व शुभेच्छांमुळे यशस्वी झाला.

**(कक्ष अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.)**

# देवनागरी सुलेखन भाग – ५

**अजय भोसले**

अमूर्त सुलेखन (Abstract Calligraphy) ही एक कलाचळवळ आहे. पारंपरिक लेखन पद्धतींचा वापर आकार, स्वरूप आणि रेषांच्या दृश्यमान भाषेत केला जातो; परंतु त्याला मर्यादा आहेत. मराठीत सुलेखन असा शब्द आहे. याच्या व्याख्येनुसार सुंदर अक्षरापुरती याची व्याख्या मर्यादित होते. तसेच देवनागरी व इतर भारतीय भाषांमध्ये रंगसंगतीचा वापर करून तयार केलेले वैविध्यपूर्ण कार्य फार अभावानेच आढळून येते. त्यामानाने अरेबिक किंवा रोमन सुलेखनात याचा वापर सढळ आढळतो. अमूर्त सुलेखन ही शैली भारतीयांकरिता पूर्णपणे अपरिचित आहे. यात अक्षरांचे सादरीकरण विविध रंगसंगतीने वेगवेगळ्या पद्धतींनी सादर केले जाते. उदाहरणार्थ काही चित्रे खाली दिली आहेत.

ॲबस्ट्रॅक्ट कॅलिग्राफी हा एक स्वतंत्र कलाप्रकार आहे. या पारंपरिक आणि नव्याने शोधलेल्या लेखन पद्धतीचा वापर रेषा, आकार, स्वरूप आणि संरचनेच्या दृश्य भाषेच्या रूपात केला जातो. या कलेत अक्षरांच्या वाचनीयतेपेक्षा त्यांच्या दृश्यसंरचनेवर अधिक भर दिला आहे. त्यामुळे या कलेतून निर्माण होणाऱ्या रचना अनेकदा सुवाच्य शब्दांचे प्रतिनिधित्व करत नाहीत, परंतु त्या रेषा आणि आकारांच्या माध्यमातून एक स्वतंत्र कलात्मक अभिव्यक्ती प्रकट करतात. ॲबस्ट्रॅक्ट कॅलिग्राफीचे सांस्कृतिक महत्त्व अत्यंत खोल आणि वैविध्यपूर्ण आहे. अनेक संस्कृतींमध्ये विशेषतः इस्लामिक जगतात लेखनकला ही फक्त संवादाचे साधन नसून आध्यात्मिक आणि सौंदर्यात्मक साधना मानली जाते.

या पार्श्वभूमीवर ॲबस्ट्रॅक्ट कॅलिग्राफी ही केवळ दृश्य नसून ती श्रद्धा, आध्यात्म आणि सौंदर्यदृष्टी यांचा संगम दर्शवते. या कलेतून अक्षर हे अर्थापेक्षा भावनांचा आणि आध्यात्मिकतेचा वाहक बनते. ॲबस्ट्रॅक्ट कॅलिग्राफीला जागतिक पातळीवर नवे महत्त्व प्राप्त झाले. या काळात जगभरातील कलाकारांनी अक्षर रचनेच्या माध्यमातून अभिव्यक्तीच्या नव्या शक्यता शोधण्यास सुरुवात केली.

ॲबस्ट्रॅक्ट कॅलिग्राफीमध्ये पारंपरिक ब्रश, शाई, पेन यांसह आधुनिक माध्यमांचा वापर केला जातो. या कलेत रेषांचा प्रवाह, आकारांचे संतुलन, रंगसंगती आणि रिक्त अवकाश यांचा वापर करून भावनात्मक परिणाम साधला जातो. येथे शब्दांचा अर्थ गौण असतो; परंतु अक्षरांचा आकार, वळण आणि लय ही कलात्मक संवादाची प्रमुख साधने ठरतात. ॲबस्ट्रॅक्ट कॅलिग्राफी ही एक अशी कलाचळवळ आहे, जी भाषेच्या पलीकडे जाऊन दृश्य अभिव्यक्तीच्या गाभ्याला स्पर्श करते. ती अक्षरांना केवळ शब्दरूप न ठेवता त्यांना भावनांचे, विचारांचे आणि आत्मिक ऊर्जेचे माध्यम बनवते. त्यामुळे ही कला परंपरेचा सन्मान राखत, आधुनिकतेच्या संवेदनांना नवी दिशा देणारी, जागतिक कला प्रवाहातील एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावशाली चळवळ ठरली आहे.

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन).**









## कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत...

सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत, नुसती तिची धावपळ,
प्रत्येकाच्या आवडी जपत, तीच करते पळापळ,
शांत बसून एका ठिकाणी चहाही पीत नाही बसत...
कौण म्हणतं बायकांना मोबाईल शिवाय नाही करमत ।।१।।

सकाळी नवऱ्याचा उपवास, म्हणून त्याला खिचडी,
पोराला वांग आवडत नाही, म्हणून त्याची भाजी वेगळी,
स्वतः मात्र आवडी बाजूला ठेवून,
दुसऱ्यांच्या आवडी बसते जपत...
कौण म्हणतं बायकांना मोबाईल शिवाय नाही करमत ।।२।।

डब्बा भरायची तऱ्हाच न्यारी,
स्वतःचा, नवऱ्याचा, मुलाचा डब्बा भरता होते, दमछाक पुरी,
नाश्त्याचा वेगळा, जेवणाचा वेगळा, सुक्या भाजीचा वेगळा,
पातळ भाजीचा वेगळा,
एवढं करून डब्याची आदलाबदल झाली,
तर घरातले तिच्या नावाने बोंबाबोंब बसतात करत...
कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत ।।३।।

घरातील सर्व पसारा आवरून लोकल ती पकडते,
चार मैत्रिणी भेटल्यात तर गप्पा ती मारते,
नाहीच भेटलं कोणी तर नाम जप करते,
ते संपल्यावर थोडं मोबाइलकडेही बघते,
तेवढ्यात आज दिराचा वाढदिवस, तिला आठवतो,
लगेच शुभेच्छांचा संदेश बसते ती टाईप करत...
कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत ।।४।।

ऑफिसमध्ये आल्यावर प्रवासाने झालेला अवतार
जरा ती सावरती,
लगेच पुरुषांना बोलायला वेळ, ती अर्धा तास मेकअप करते,
सुगंधी गजऱ्याची माळ आपल्या केसात ती माळते,
त्या मंद सुवासाने वातावरण सुगंधी ती करते,
काम करण्याचा नवीनच, एक उत्साह तिला येतो,
कामाबरोबरच ती इतरांच्या समस्या बसते सोडवत...
कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत ।।५।।

काम करताना तिचं लक्ष असतं चौफेर,
जेवणाला मैत्रिणी जमल्या की रंगतो थोडा गप्पांचा खेळ.
याही वेळेस ती, जेवला का, गोळ्या घेतल्या का,
अशा चौकश्या बसते करत...
कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत ।।६।।

संध्याकाळी परतताना तोच प्रवास,
आता मात्र डोक्यात रात्रीच्या जेवणाचा घाट,
घरात पाय टाकतात नवऱ्याला चहा हवा,
मुलांना काहीतरी खायला हवं,
हे सर्व झाल्यावर स्वयंपाक बसते रांधत...
कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत ।।७।।

सर्व आवरून उद्याच्या भाजीची तयारी करून ठेवते,
उद्याचा नाश्ता काय? याचा विचार करत बसते,
मैत्रिणींनी सांगितलेली नवीन पदार्थाची रेसिपी
यु-ट्यूबवर बसते पाहत...
कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत ।।८।।

ही सर्व तारेवरची कसरत करूनही ती कधी दमत नाही,
आजारी पडलो तर कोण आपली सेवा करणार
हा विचारही तिच्या मनाला शिवत नाही,
नवरात्रीच्या नवरंगात, मनसोक्त न्हाऊन ती निघते,
तर कधी दिवाळीत प्रकाशाने अंगण उजळून टाकते,
या सर्वांच्या बदल्यात प्रेमाचं दान फिरते मागत...
कौण म्हणतं बायकांना मोबाइलशिवाय नाही करमत ।।९।।

**– सारिका नि.चौधरी,**
**सहायक कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग.**



# आई तुझा हात हवाय गं
# मला माझ्या डोक्यावर...

आई तुझा हात हवाय गं मला माझ्या डोक्यावर,
थापटून मला झोपवायला अचानक जाग आल्यावर,
तू गेल्यापासून जागा होतो दचकून,
तुझी आठवण जाते मला रडवून,
तू का लवकर सोडून गेलीस गाव,
आईविना लेक असे घेतात माझं नाव,



जेवणाची आता मला चवच लागत नाही,
तुझ्या हाताशिवाय माझी भूकच भागत नाही,
पोरकेपणाचा माझ्याभोवती ठेवून गेलीस जाळ,
इतकी कच्ची होती का तुझ्यामाझ्यातील नाळ,
तिथे आहे का तुझ्याशी बोलायला भरपूर,
उगी रडू नकोस दाबून स्वतःचा ऊर,
आता मी रडत नाही त्रास झाला तरी,
ठाऊक मला आता तू नाही पृथ्वीवरी,
आठवण जरी आली तुझी तरी मी रडत नाही,
मी हसल्याशिवाय तुला चैन पडत नाही,
रोज रात्र झाली की आठवण तुझी काढतो,
अंथरुणात गप डोळे पुसून शांत पडून रहातो,
बघ तुझा लेक आता शहाणा झाला आहे,
परिस्थितीने पण थोडा हतबल झाला आहे,
तू घरात नाही म्हणून सांभाळेल मी स्वतःला,
तुझी मात्र काळजी घे असे सांग मात्र देवाला,
मी आता थकलोय तुझी वाट पाहून,
जा न मला लवकर तुझ्याकडे घेऊन...

**– अश्विन शंकरराव रोहिणीकर (नागरे),**
**शिधावाटप अधिकारी, अन्न नागरी पुरवठा.**

कविता

## स्वप्न...

'स्त्री शिक्षण' हे आमचे स्वप्न होते,
प्राणाच्या पलीकडे आम्ही ते जपले होते,
स्वप्नाच्या पूर्तीसाठी जगाला हुंकारले,
उत्कर्षाचा आविष्कार फुलण्यासाठी फुंकारले,
स्वप्नाचे सत्यरूप जगी या झंकारले,
झंकाराचे नाद दिगंतात निनादले,
कर्तव्याच्या हक्काच्या जाणिवांना पंख फुटले
मुक्ती स्वातंत्र्याच्या कल्पनांना बळ आले
हे सारे घडणार होते अपेक्षितच होते,
त्यागाच्या कल्पनांचे बांध तुटणारच होते;
पण संसाराच्या कल्पनांना छेदणारे मुक्तिपंख,
उद्याच्या पिढीला जाळणारे 'अग्निपंख'
स्वतःस जाळून जगणारे,
कर्तव्याची पायमल्ली करत हक्कांसाठी झगडणारे
याची आम्ही अपेक्षाच केली नव्हती,
अपेक्षाच केली नव्हती!!

**– शैलेजा विजय,**
**निवृत्त मुख्याध्यापिका.**

# माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासन आणि जनता यांना जोडणारा तो एक महत्त्वाचा दुवा असून शासनाचे उपक्रम जनतेपर्यंत आणि त्याबाबतच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहोचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचालनालयास पार पाडावी लागते.

महाराष्ट्र शासनाचे विविध कल्याणकारी निर्णय, उपक्रम, धोरणे, विविध मोहिमा आणि विविध योजनांची माहिती या यंत्रणेद्वारे जनतेपर्यंत पोहोचविण्यात येते. दैनंदिन वृत्तविशेष प्रसारित करणे, प्रसिद्ध झालेल्या साहित्याची निर्मिती करून वाटप करणे, विविध विषयांवर माहितीपट निर्माण करणे, राज्य विभागीय व जिल्हा स्तरावर प्रदर्शने आयोजित करणे, विभागीय आणि जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत योजनांची शासनासंबंधीची माहिती पुरविणे, शासकीय जाहिरातींचे वृत्तपत्रांना वाटप करणे या गोष्टींचा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यात समावेश होतो. जनतेची मते व प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी राज्यात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रांची व अन्य प्रकाशनांची रोजच्या रोज या विभागामार्फत माहिती घेऊन ती शासनास पुरवली जाते. मुख्यालयात आणि राज्यभर सर्वत्र असंख्य प्रकारचे उपक्रम दैनंदिन स्वरूपात राबवण्यात येत असतात. त्यांची तत्काळ आणि प्रभावी प्रसिद्धी करण्याचे काम महासंचालनालयास करावे लागते.



## रचना

महासंचालक या पदावरील सनदी अधिकारी या यंत्रणेचा प्रमुख असतो. महासंचालकांच्या अखत्यारित संचालक (माहिती) (प्रशासन), संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), मुंबई येथे व छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथेही संचालक (माहिती) ही पदे आहेत. विभागीय स्तरावर ७ उपसंचालकांची पदे आहेत. (कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नवी दिल्ली) आणि जिल्हा माहिती कार्यालये (३४) कार्यरत आहेत. तसेच महाराष्ट्रातील योजनांची माहिती महाराष्ट्राबाहेरील जनतेला देण्यासाठी दिल्ली आणि गोवा येथे महाराष्ट्र परिचय केंद्रे कार्यरत आहेत.

**कार्यपद्धती :** उपलब्ध माध्यमांचा प्रसिद्धीच्या कामासाठी वापर करून घेण्यात येतो. मुख्यालयात (१) वृत्त (२) जाहिरात (३) प्रदर्शने (४) प्रकाशने (५) वृत्तचित्र आणि (६) माहिती–तंत्रज्ञान शाखा कार्यरत आहेत. तसेच आस्थापना आणि लेखा या शाखा कार्यरत आहेत.

## अधिकारी / कर्मचारी

महासंचालनालयात बहुतेक सर्व अधिकारी–कर्मचाऱ्यांनी माहिती तंत्रज्ञानविषयक प्रशिक्षण घेतले असून या ज्ञानाचा लाभ ते आपल्या दैनंदिन कामकाजात करून घेत असतात.

सर्व जिल्हा माहिती अधिकारी हे पत्रकारितेचे पदवीधर/पदविकाधारक असून त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रत्यक्ष कामाचा अनुभवही घेतलेला असतो. दैनंदिन वृत्त प्रसारणाच्या कामाबरोबरच माध्यम प्रतिनिधींना अन्य प्रकारची माहिती/संदर्भ उपलब्ध करून देण्याचे आणि तत्सम जनसंपर्काचे कामही या अधिकाऱ्यांना करावे लागते, त्यासाठी आवश्यक तेव्हा मोहिमा राबवण्यात येतात.

## विभागीय/जिल्हास्तरीय/उपमाहिती कार्यालये/ माहिती केंद्रे/परिचय केंद्रे

जनसंपर्क माध्यमांद्वारे शासन आणि जनता यांना जोडणारा एक दुवा या नात्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कामाचे स्वरूप दुहेरी आहे. विकास कार्यक्रमांच्या तसेच सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या अन्य कार्यक्रमांच्या बाबतीत शासनाची ध्येयधोरणे, भूमिका, उद्दिष्टे आणि कामगिरी याबद्दलची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम हे महासंचालनालय करीत असते. त्याचवेळी या सर्व गोष्टींच्या बाबतीतील सर्वसामान्य जनतेच्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून उमटलेल्या प्रतिक्रिया शासनाच्या नजरेस आणण्याची कामगिरीही ते बजावीत असते. या सर्व कामगिरीसाठी ही कार्यालये पूरक म्हणून काम करत असतात. दैनंदिन वृत्तविशेष प्रसारित करणे, प्रसिद्धी साहित्याचे वाटप करणे, विविध विषयावर निर्मित केलेले वृत्तचित्र नागरी; तसेच ग्रामीण भागातून जनतेस नित्यनेमाने दाखविणे, विभागीय व जिल्हा स्तरावर प्रदर्शने आयोजित करणे, शासकीय जाहिराती स्थानिक, जिल्हा व विभागीय स्तरावर वितरित करणे आदी कामे ते पार पाडतात.

महाराष्ट्राबाहेर दिल्लीसारख्या व गोव्यात वास्तव्य करीत असलेल्या मराठी लोकांच्या व महाराष्ट्रातील त्यांच्या बांधवांमध्ये परस्पर भावनिक व सांस्कृतिक संबंध दृढमूल करण्याच्या दृष्टीने एक उपयुक्त व्यासपीठ निर्माण करण्याचे महत्त्वाचे कामही ते करत आहेत.

**टीम आपलं मंत्रालय**

# कोस्टल कर्नाटक व श्रृंगेरी मठ ट्रीप

**राजेंद्र कुमटगी (से.नि.)**

आमचा १४ जणांचा ग्रुप ४ सप्टेंबर रोजी दुपारी मत्स्यगंधा एक्स्प्रेसने मुंबईतून निघून ५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता उडुपी कर्नाटक येथे पोहोचला. आम्हाला घेण्यासाठी टेम्पो ट्रॅव्हलर सज्ज होतीच, याच गाडीने पुढील पाच दिवस आमचा प्रवास होणार होता.

उडुपी मालपे बीच रस्तावरील हॉटेल कोस्टल पॅलेसमध्ये आमची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. हॉटेल एकदम नवीन होते, सुरू होऊन तीनच महिने झाले होते, सगळे कसे नवीन नवीन होते. हॉटेलमध्ये चेक इन केल्यानंतर आवरून नंतर आम्हाला श्रीकृष्ण मठ येथील मंदिरात जायचे होते.

उडुपी श्रीकृष्ण मठ हे कर्नाटकातील उडुपी येथील एक ऐतिहासिक हिंदू मंदिर आहे. ज्याची स्थापना तेराव्या शतकात द्वैत तत्त्वज्ञानी माधवाचार्य यांनी केली होती. हे भगवान श्रीकृष्णाला समर्पित एक पवित्रस्थळ आहे.

दुपारी श्रीकृष्ण मठ मंदिर येथे दर्शन घेतले. थोडीशी गर्दी होती. मंदिराचा परिसर खूप चांगला आहे. दर्शनरांगेसाठी व्यवस्था चांगली केली आहे. दर्शनरांगेतून चालत असताना मंदिराच्या आवारात एक तलाव दृष्टिक्षेपास पडतो. या तलावाच्या मध्यभागी यज्ञकुंड आणि काही मूर्ती दिसत होत्या. दर्शन रांगेत एक तास गेला, दर्शनही चांगले झाले. मंदिराच्या सभामंडपात बसून श्रीकृष्णाष्टकम् स्तोत्राचे पारायण ही केले, या प्रसन्न वातावरणात दीड–दोन तास व्यतीत केल्यानंतर नंतर हॉटेलवर येऊन विश्रांती घेतली.

संध्याकाळी महिला वर्गाला कर्नाटकातील प्रसिद्ध म्हैसूर सिल्क, इरकल या प्रकारच्या साड्या खरेदीसाठी जायचे होते. उड्डीपीमधील साड्यांच्या दुकानांची माहिती काढून आणलीच होती. महिलावर्ग साड्या खरेदीसाठी गेला. पुरुषवर्ग विश्रांती करून संध्याकाळी सहा वाजल्यानंतर मालपे बीच फिरायला गेला. साड्या खरेदीनंतर आम्ही सगळेच मालपे बीचवर एकत्र झालो. खादाडी केली, भेळेसारखाच; पण शेव, पापडी किंवा गाठीया नसलेली कुरमुरे, मिरची, कांदा,



टोमॅटो, कोथिंबीर, लिंबू रस आणि खोबरेल तेलात कालवलेली भेळच; पण नाव झुरमुरी या प्रकाराचा आस्वाद घेतला आणि हॉटेलवर परतलो. आम्हाला सगळ्यांनाच दाक्षिणात्य मेंगलोर बन हा पदार्थ खायचाच होताच. हा पदार्थ मैदा, साखर, पिकलेल्या केळ्याचा गर हे सगळे मिसळून ते एक रात्रभर इडलीच्या पिठासारखे आंबवले जाते आणि त्यांच्या जाड पुरीसारखा लाटून तेलात तळला जातो. तो ही आम्हाला आमच्याच हॉटेलमधील रेस्टॉरंटमध्ये खाण्यास मिळाला, तो सगळ्यांनाच आवडला. नंतर आईस्क्रिम वगैरे झाले, विश्रांतीसाठी परतलो.



६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता तयार होऊन ब्रेकफास्ट केला. आज दिवसभरात ५-६ तासांचा प्रवास होता. होर्नाडु येथील अन्नपूर्णा माता मंदिर दर्शन व प्रसाद घेऊन संध्याकाळपर्यंत श्रृंगेरी येथे पोहोचण्याचे नियोजन होते. त्यानुसार गाडीतून प्रवास सुरू झाला. आद्य शंकराचार्य रचित स्तोत्रे म्हणत म्हणत प्रवासाची प्रसन्न सुरुवात झाली. गप्पा गाणी सुरू होती. बाहेरील वातावरणही एकदम मस्त होते, उडुपी शहर गेल्यानंतर एक दीड तासांतच जंगल आणि घाटातून प्रवास सुरू झाला, हे जंगल म्हणजे कुदरेमुख अभयारण्य विविध पक्षी, वन्य प्राण्यांनी समृद्ध असे हे जंगल आहे. रस्त्यावर लावलेल्या फलकावरून हे निदर्शनास येत होते की, या जंगलात हत्ती, वाघ, बिबटे आणि हरण वगैरे प्राण्यांच्या वास्तव्याचा हा प्रदेश आहे, परंतु पावसाळ्यात काही दिसण्याची शक्यता नसते. या दाट जंगलातून जाणाऱ्या रस्त्यावरून आमची गाडी चालली होती. रस्ताही चांगला होता. चिकमंगळूर हा जिल्हा कॉफी कॅपिटल ऑफ इंडिया म्हणून प्रसिद्ध आहे. अर्थात हा प्रदेश हिरव्यागार डोंगरांनी वेढलेला आहे, कॉफी आणि चहाचे मळे दुतर्फा मन आकर्षित करून घेत होते. काही चहाच्या मळ्यात चहा कॉफी विक्रीचे स्टॉल होते, तेथे लोक उतरून चहा कॉफी पावडर घेत होते. तसेच त्या मळ्यांच्या पार्श्वभूमीवर सेल्फी फोटोग्राफी ही चालली होती. वातावरण एकदम मस्त होते.

अशा नयनरम्य तीन तासांच्या प्रवासानंतर आम्ही होरनाडु येथील प्रसिद्ध अन्नपूर्णा मंदिरात पोहोचलो. विशेष गर्दी नव्हती, दर्शन छान झाले. आरतीच्या वेळी मंदिरातील गाभाऱ्यातील असंख्य पणत्याही लावण्यात आल्या होत्या. आरतीस उपस्थित राहण्याची संधीही मिळाली. अन्नपूर्णा मातेच्या मंदिरात भोजन प्रसादची खूप उत्तम व्यवस्था आहे. भात, रस्सम, पायसम (तांदळाची खीर) आणि ताक असे उत्तम चवीचा सात्विक भोजन प्रसाद घेऊन आम्ही पुढील प्रवासासाठी निघालो.

छान डोंगर-टेकड्या, जंगल ओलांडत आमची गाडी चालली होती. कोकणासारखेच वातावरण नारळी पोफळीच्या बागा, त्या सुपारीवर मिरी वगैरे मसाल्याच्या वेलांची लागवडही दिसून येत होती. प्रवास सुरू होता, भोजन चांगलेच झाल्याने सगळ्यांच्या झोपेची डोळ्यांवर झापड आली होती. बहुतेक सगळ्यांनीच डुलक्या काढल्या. दोन अडीच तासांच्या प्रवासानंतर आम्ही संध्याकाळी सहा-साडेसहाच्या सुमारास श्रृंगेरी येथील गौतम होम स्टे येथे पोहोचलो.

गौतम होम स्टे पाहून आम्ही सगळेच खूश झालो. प्रशस्त अशा बैठ्या ट्विन कॉटेजेस, मोठ्या-मोठ्या वॉशरूम, छान संपूर्ण ओपन रेस्टॉरंट, समोर जंगलसदृश झाडी आणि नारळ सुपारीची बाग, पक्ष्यांचे आवाज आणि मोर नृत्य करत होते. अर्थात श्रृंगेरी हे गावच शारदा मातेचे मंदिर आणि आद्य शंकराचार्यांच्या पवित्र पदस्पर्शाने पावन झालेले आहे. तेथे मोर असणारच, हे सर्व पाहून आम्ही या जागेच्या प्रेमातच पडलो.

आज जवळपास सात तास प्रवास झाला होता. त्यामुळे आता मंदिर दर्शन किंवा आद्य शंकराचार्य मठातील कार्यक्रमास जाण्याचा उत्साह कोणालाच नव्हता. अर्थात उद्याचा पूर्ण दिवस येथेच मुक्काम असल्याने देवदर्शन व्यवस्थित होणारच होते. त्यामुळे सगळ्यांनी त्या

ओपन रेस्टॉरंटच्या खुर्च्यांचा ताबा घेतला आणि गप्पाचा फड जमविला. होम स्टेमध्येच दाक्षिणात्य पद्धतीचे भोजन घेऊन नंतर पत्ते खेळणे ही झाले.

तेथे चर्चा करताना तेथील स्टाफने एक शंका उपस्थित केली. उद्या चंद्रग्रहण आहे. त्यामुळे मंदिर दर्शन आणि शंकराचार्य मठातील प्रार्थना बहुधा बंद असेल. आम्हाला ही सगळ्यांनाच थोडी भीती वाटली, ज्यासाठी येथे आलोय तेच होणार नाही की काय? याच विवंचनेत झोपी गेलो.

७ सप्टेंबर ट्रीपचा तिसरा दिवस सकाळी मोरांच्या केकावलीने (ओरडणे) लवकर जाग आली, काही जण मॉर्निंग वॉक करायला बाहेर पडले होते. उठल्यावर पहिल्यांदा शारदा मंदिर व्यवस्थापनास फोन केला. मंदिरात सकाळी १२ वाजेपर्यंतचे सर्व कार्यक्रम सुरू आहेत, हे समजल्यावर आनंद झाला.

सगळ्यांनी इडली मेदुवडा आणि शेवयांचा उपमा असा मस्त नाष्टा केला. आज सगळेजण विशेष तयार झाले होते. महिलावर्गाने पांढऱ्या, क्रिमी रंगांच्या साड्या, पुरुषांनी पांढरी लुंगी आणि उपरणे असा वेश परिधान केला होता. अर्थात त्या मंदिरात भारतीय पारंपरिक पोषाख अनिवार्यही आहे.

आम्ही राहिलेलो त्या ठिकाणाहून मंदिर दोन किमी अंतरावर होते. गाडीने १० मिनिटात तेथे पोहोचलो. मंदिराच्या बाहेर फुलांचे गजरेही घेण्यात आले. मंदिराचे प्रवेशद्वार हे भव्य असे गोपुर आहे. तेथूनच फोटोग्राफीला सुरुवात झाली. प्रवेशद्वारातून आता गेल्यावर भव्य मंदिरे, स्वच्छ आणि सुंदर परिसर, मंदिरासमोरच्या पटांगणात दोन हत्ती बांधून ठेवले होते. माहुताच्या इशाऱ्यावर पर्यटकांकडून पैसे मिळाल्यावर हत्ती सोंडेने आशीर्वादही देत होते. लहान-मोठे सगळेच या ठिकाणी रमत होते, फोटोग्राफी तर सुरू होतीच. शारदा मंदिरात आरतीची तयारी सुरू होती. मंदिरातील वातावरण खूप छान प्रसन्न अतिशय सुंदर होते, आम्ही येथील पूजाविधी पावती घेतली होती. त्यामुळे आम्हाला मंदिरात बसून विविध स्तोत्रे म्हणत प्रार्थना करण्याची आणि आरतीस जवळून उपस्थित राहण्याची संधी मिळाली. आरती संपन्न झाल्यानंतर आम्ही तेथील भोजनप्रसाद घेण्यासाठी येथील प्रसादालयात गेलो. तेथेही प्रसाद घेण्यासाठी खाली पाटावर बसून किंवा ज्यांना खाली बसता येत नाही, त्यांच्यासाठी टेबल खुर्चीचीही व्यवस्था होती. अत्यंत प्रेमाने विचारपूस करत येथील सेवेकरी जेवण वाढत होते. पायसम, भात, सांबार, बीटाची पातळ भाजी आणि हिंगयुक्त ताक असा मेन्यू होता. भोजनप्रसाद एकदम छान होता. प्रसाद घेऊन झाल्यावर, याच मंदिराच्या परिसरात तेराव्या शतकातील दगडाचे बांधकाम असलेले विद्याशंकराचे मंदिर आहे. त्या मंदिरात १२ राशींचे १२ स्तंभ उभे आहेत. छतावर दगडात कोरलेल्या मूर्तीही आहेत. तेथेही चांगले दर्शन झाले, मंदिराच्या बाहेर त्या दगडी कोरीवकाम केलेले मंदिराच्या पार्श्वभूमीवर खूप छान मनसोक्त फोटोग्राफीही करण्यात आली.

त्यानंतर गाडीने श्रृंगेरीमधील एका उंच टेकडीवर नव्याने उभारण्यात आलेल्या शंकराचार्यांची मूर्ती पाहण्यासाठी गेलो. मूर्ती खूप उंचावर बसवण्यात आली आहे. तेथील वरच्या गॅलरीत अगदी मूर्तीजवळ जाण्यासाठी विद्युत सरकते जिने करण्यात आले आहेत. त्या वरच्या गॅलरीतून संपूर्ण श्रृंगेरी गावाचे अत्यंत विहंगम दृश्य दिसते. तेथेही फोटोग्राफी करून नंतर आमच्या निवासस्थानी परत पोहोचलो. छान विश्रांती घेतली. आज चंद्रग्रहण असल्याने होम स्टेमधील संध्याकाळचे जेवण ६ पूर्वी देणार होते, जेवण घेतले आणि नंतर रात्री ८.३० वाजता आद्य शंकराचार्यांच्या मठामधील पूजेसाठी निघालो.

सध्या या शारदापीठाचे ३७वे शंकराचार्यांचे वास्तव या ठिकाणी आहे. या पूजेमध्ये ते स्वतः उपस्थित असतात, तेथील विद्यार्थी, आमच्यासारखे पर्यटकही त्या हॉलमध्ये बसून पूजाविधीत सामील झालो. तेथे महादेवाच्या स्फटिक लिंगाचा अभिषेक पूजाविधी पाहता आला. अत्यंत शांत, धीरगंभीर, प्रसन्न वातावरणात अत्यंत सुरात आद्य शंकराचार्यांची स्तोत्रे, श्रीसुक्त वगैरे श्रवण करीत एक छान अनुभव मिळाला.

रात्री १०च्या सुमारास होम स्टेवर परत आलो. आकाशात पौर्णिमेचा चंद्र दिसत होता, चंद्रग्रहणाला सुरुवात झाली होती. त्या ग्रहणाचा आनंद घेत ग्रुपमध्ये पत्ते खेळणेही सुरू होते, रात्री १२ वाजताच्या आकाशात ढग आल्याने चंद्र दिसेनासा झाला. आमचे खग्रास चंद्रग्रहण पाहण्याची संधी गेली. एक मस्त दिवस संपला आम्ही सर्व आपापल्या खोल्यांमध्ये विश्रांतीसाठी परतलो.

८ सप्टेंबर ट्रीपचा चौथा दिवस सकाळी श्रृंगेरी येथील होम स्टेमधून चेक आऊट करून आम्ही जोग फॉल्ससाठी निघालो, तीन तासांचा प्रवास होता. डोंगर-दऱ्या आणि जंगल ओलांडत आम्ही जोगफॉल्स येथे केटीडीसी (कर्नाटक टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) खोल्यांमध्ये आरक्षण केले होते. आजचा मुक्काम तेथेच होता. गाडीने त्या परिसरात प्रवेश केला, तेथे संपूर्ण परिसराच्या नूतनीकरणासोबतच नवीन इमारतींचे बांधकाम सुरू होते. सगळीकडे बांधकामाचे अस्ताव्यस्त पडलेले बांधकाम साहित्य, काही ठिकाणी चिखल झालेला परिसर पाहून थोडासा विरस झाला. दुपारचे २ वाजले होते, आम्हाला भूकही लागली होती. त्या शासकीय व्यवस्थापन असलेल्या रेस्टॉरंटची अवस्था पाहून आपण कसे तरी पोट भरूयात म्हणून जेवणाची ऑर्डर दिली, जेवण ठीक होते. त्यानंतर राहण्यासाठी रुम ताब्यात घेतल्या. आतापर्यंत या परिसरात कशाला आलो असे वाटत होते; पण येथील रुममध्ये प्रवेश करताच एकदम मूड बदलून गेला. एकदम पंचतारांकित हॉटेलमधील व्यवस्था असते, तशा भव्य खोल्या सजवलेल्या होत्या, खोलीमधील एक मोठा पडदा असलेली काचेची भिंत होती. तो पडदा उघडला आणि अक्षरशः आम्ही अचंबित झालो. या काचेतून संपूर्ण जोग फॉल्सचा धबधबा दिसत होता. अप्रतिम दृश्य होते, तेथे छान दोन आरामदायी खुर्च्याही ठेवल्या होत्या, तेथे बसून हा धबधबा पाहता येत होता. तेथेच बसून चहा-कॉफीचा आस्वाद घेतला.

धबधब्याच्या समोरच या परिसरात पर्यटकांसाठी चांगल्या गॅलरी उभ्या करण्यात आल्या आहेत. आम्ही संध्याकाळी तेथे पोहोचलो, तर धबधब्यासमोरील दरीमध्ये पावसाळी ढग साठले होते. त्यामुळे धबधबा दिसेनासा झाला होता; पण थोड्याच वेळात दरीतून येणारे ढग विरळ होत गेले आणि धबधबा दिसू लागला. जणूकाही एखादी सुंदर तरुणीच्या चेहऱ्यावरील ओढणी हळूवार दूर व्हावी आणि सुंदर चेहरा समोर यावा असे काहीसे झाले. नंतर धबधब्याच्या पार्श्वभूमीवर फोटोग्राफी सुरू झाली. ही फोटोग्राफी अंधार पडल्यावर थांबली. रात्रीचे भोजन त्याच केटीडीसीच्या रेस्टॉरंटमध्ये उरकले. तशी आजची हॉटेल मुक्कामाची ट्रीपची शेवटची रात्र आणि पुन्हा पत्ते, गप्पा रंगल्या नंतर विश्रांती.



९ सप्टेंबर ट्रीपचा शेवटचा दिवस. सकाळी लवकर उठून बरेच जण जोग फॉल्स या धबधब्याच्या केटीडीसी कॅम्पसचा संपूर्ण परिसर फिरून पाहत होते. तेथून जवळपास ७-८ छोट्या-मोठ्या धबधब्याच्या धारा डोंगरावरून दरीत झेपावताना दिसत होत्या. खाली दरीमध्ये पॉवर प्रोजेक्ट उभारण्यात आला होता. हे सर्व पाहून आम्ही केटीडीसी हॉटेलमधून चेक आऊट केले.

जोग फॉल्सवरून मुरडेश्वर मंदिर पाहण्यासाठी निघालो, हाही प्रवास घाटमाथा उतरून आम्ही पुन्हा समुद्रसपाटीकडे चाललो, हे बदलत्या तापमानामुळे लक्षात येऊ लागले. हवेतील गारव्याची जागा आता दमट हवामानाने घेतली; पण आमचा उत्साह कमी झाला नव्हता. दोन तासांच्या प्रवासानंतर मुरडेश्वर हे दृष्टिक्षेपात आले. समुद्राच्या काठी उभारण्यात आलेली भव्यदिव्य भगवान शिवशंकर यांची मूर्ती खूप लांबवरून दिसत होती. आम्ही मुरडेश्वर मंदिर परिसर पोहोचलो. मंदिराचे प्रवेशद्वार भव्य असे गोपुर बांधण्यात आले आहे. यामध्ये वैशिष्ट्य असे की, या गोपुरात लिफ्टची व्यवस्था करण्यात आली आहे. आम्ही तिकीट घेऊन लिफ्टने हे १८ मजली गोपुराच्या वरच्या भागात पोहोचलो. तेथून अरबी समुद्राचे विहंगम दृश्य दिसते. समुद्राच्या पार्श्वभूमीवर भगवान शिवशंकर यांची भव्य उंच मूर्ती खूप उठून दिसत होती. समुद्राच्या काठावर नारळी, पोफळीच्या बागा खूप लांबपर्यंत पसरलेल्या दिसून येत होत्या. हे दृश्य कॅमेरात आणि डोळ्यात साठवून पुन्हा लिफ्टने खाली उतरलो. नंतर येथील मुरडेश्वर महादेवाच्या मंदिरात दर्शन करून तेथून निघालो. आता ट्रीपमधील शेवटचे ठिकाण म्हणजे गोकर्ण महाबळेश्वर मंदिर हे ठिकाण मुरडेश्वर येथून दीड तास प्रवासाच्या अंतरावर होते.

दुपारचे जेवण करून आम्ही गोकर्ण महाबळेश्वर या मंदिरात पोहोचलो. थोडीशी गर्दी होती, एक तासाभरात स्पर्शदर्शन चांगले झाले. गोकर्ण महाबळेश्वर येथील समुद्रकिनारा खूप चांगला आहे; पण आम्हाला रात्रीच्या ट्रेनने मुंबईत परत यायचे असल्याने समुद्रावर गेलो नाही. आमचे ट्रेनचे रिझर्व्हेशन कुमटा या रेल्वे स्टेशनवरून असल्याने तेथे पोहोचलो. रात्री ८ वाजताची ट्रेन होती. ट्रेनमध्ये चढताच आपापल्या बर्थचा ताबा घेतला. आजच्या प्रवासातील दमणुकीमुळे सगळ्यांना प्रवासात चांगली झोप लागली होती. ट्रेन सकाळी १०.३० ला मुंबईस पोहोचली. अशा रितीने ट्रीपची सांगता झाली.

ही ट्रीप फक्त पर्यटन नव्हती, तर ती एक संस्कारमय, आध्यात्मिक आणि सौंदर्यसंपन्न यात्रा होती. दक्षिण भारतातील मंदिरांची भव्यता, समुद्र व निसर्गसौंदर्य, अन्नपूर्णा व शारदामातेचे दर्शन, शंकराचार्य मठातील पवित्रता, जोग फॉल्सचा नजारा आणि शेवटी मुरुडेश्वर-गोकर्णचा अनुभव, हे सर्व मनात खोलवर रूतून बसले आहे.

**(कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन.)**

**खिद्रापूर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील एक छोटेसे गाव. हे गाव कोल्हापूर शहरापासून साधारण ७० किमी अंतरावर आहे. खिद्रापूर म्हणजे अध्यात्म आणि मानवी सौंदर्याच्या मिलापावर लिहिलेली दगडातील कोरीव कविता आहे. खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी एक अद्भुत घटना घडते. चंद्रप्रकाशाचा वर्तुळाकार कवडसा स्वर्गमंडपातील वर्तुळाकार झरोक्यामधून जमिनीवरील चंद्रशिलेसोबत तंतोतंत जुळतो. संपूर्ण भारतात हे प्रकाशपर्व प्रसिद्ध आहे.**

# अद्भुत खगोलशास्त्रीय प्रकाशपर्व

**प्रवीण टाके**

दिवाळीच्या दीपोत्सवात कोल्हापूर जिल्ह्यासाठी हे प्रकाशपर्व अध्यात्म आणि खगोलशास्त्रीय चमत्कार म्हणून हजारो वर्षांपासून चर्चेत आहे.

या प्रकाश-योगायोगाचा अनुभव घेण्यासाठी शेकडो पायांना खिद्रापूरच्या मंदिराची आठवण होते. दिवाळीनंतरच्या दीपोत्सवात कोल्हापूर व महाराष्ट्रासाठी ही एक पर्वणी असते. चंद्र प्रतिबिंबाचा हा सोहळा पाहण्यासाठी त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा येथून अनेक पर्यटक येतात. खगोलशास्त्रीयदृष्ट्या या अनुभूतीला वेगळे महत्त्व आहे. हजारो खगोलशास्त्रीय, देश-विदेशातील छायाचित्रणातील मान्यवर या ठिकाणी दिवाळीनंतर येणाऱ्या पौर्णिमेला अर्थात त्रिपुरारी पौर्णिमेला मध्यरात्री एकत्रित येतात. काही क्षणांसाठी वास्तुशास्त्र आणि खगोलशास्त्रातील अद्भुतता अनुभवण्यासाठी देशभरातील चिकित्सक अभ्यासक या ठिकाणी येत राहतात. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक प्राचीन मंदिरांपेक्षा खिद्रापूरचे मंदिर लक्षणीय ठरते.


(छायाचित्रकार : सुयश टोणपे)

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री मंदिरातील हजारो दिवे प्रज्ज्वलित होतात. भजन-कीर्तन, नृत्य आणि दीपोत्सवाचे कार्यक्रम होतात. हजारो वर्षांपासूनचा हा उत्सव या ठिकाणी सुरू आहे. अध्यात्म आणि विज्ञान या ठिकाणी हातात हात घालून निसर्गाच्या अद्भुत चमत्काराला अनुभवते.

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री जेव्हा चंद्र या मंदिरातील स्वर्गमंडपाच्या गोलाकार भागावर येतो, त्या ठिकाणावरून चंद्राचा पूर्ण प्रकाश त्याच आकाराच्या चंद्रशिलेवर पडतो. काही सेकंदांचा हा पूर्णतेचा आनंद असतो. अगदी खगोलशास्त्रज्ञांच्या घड्याळातून घेतलेल्या अंदाजानुसार केवळ सहा ते बारा सेकंदाचा हा परिपूर्ण गोलाकारांचा प्रकाशीय मिलाप असतो.

या दीपोत्सवासाठी ओळखल्या जाणाऱ्या या मंदिराचे वास्तुशिल्पदेखील अभ्यासण्यायोग्य आहे. देशभरातील शिल्पप्रेमी या मंदिराला कायम भेटी देत असतात. हे मंदिर कृष्णा नदीच्या काठी वसलेले आहे. त्यामुळे नदीच्या प्रवाहाप्रमाणे सजीव व बोलक्या शिल्पसौंदर्याची अनुभूती मंदिराच्या परिसरात कायम येत राहते.

कोपेश्वर मंदिर हे प्रामुख्याने शिव (महादेव) आणि विष्णू यांना समर्पित आहे. मंदिराची उभारणी साधारणतः चालुक्य व शिलाहार राजवटीत सुरू झाली असावी असे ऐतिहासिक मत आहे. नंतर ११-१२ व्या शतकात शिलाहार व यदुवंशीय राजे यांनी मंदिराचा विस्तार केला. मंदिराला भारत सरकारद्वारे राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून मान्यता दिलेली आहे.

कोपेश्वर मंदिर हे शिल्पकलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ते शिलाहार शैली व मध्ययुगीन महाराष्ट्रातील मंदिरकलांचा संगम दर्शवते. मुख्य मंडप, आच्छादित मंडप, अंतराळ व गर्भगृह या भागांमध्ये मंदिर विभागलेले आहे. बाहेर एका मंडपावर ४८ खांब आहेत, हे मंडप स्वर्गमंडप म्हणून ओळखले जाते.

या ४८ खांबांच्या आत एक वर्तुळाकार खुली जागा आहे. ही जागा होम, यज्ञ, हवन यासाठी राखून ठेवली गेली आहे, ज्यामुळे धूर बाहेर निघेल. मात्र हेच प्रयोजन त्रिपुरारी पौर्णिमेला अद्भुत खगोलशास्त्रीय निमित्त ठरते. स्तंभांच्या आतील भागावर अनेक देव-देवतांची शिल्पे आहेत. या मंदिर परिसरात अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे.

मंदिराच्या शिखरापासून ते गर्भगृहापर्यंत अनेक लहान शिखरांची ओळ आहे, जी कलात्मकतेने सजवलेली आहे. खिद्रापूरला येण्यासाठी अनेक मार्ग आहेत. सांगलीमार्गे किंवा गावातील स्थानिक रस्ते वापरून या ठिकाणी पोहोचता येते. कोल्हापूरपासून केवळ ७० किलोमीटर अंतरावर हे प्रख्यात कोपेश्वर मंदिर आहे.

**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर.**

# आम्ही आयुष्यात काय achieve केलं?

**अजय भोसले**

Bucket list चित्रपटाबाबत एक मेसेज व्हॉट्सअॅपवर फिरत होता. सुदैवाने कालच तो चित्रपट WB वर होता. मृत्यूची चाहूल लागलेल्या दोन वृद्धांची Bucket list म्हणजे मृत्यूपूर्व करावयाच्या कामांची यादी. जगण्याच्या रहाटगाड्यात छोट्या–छोट्या इच्छा अपूर्ण राहतात, काही पैशांमुळे किंवा इतर कारणांमुळे. सगळ्याच गोष्टींसाठी पैशाची गरज असते असे नाही. एखाद्याशी विसंवादामुळे होणारा तणाव केवळ बोलण्याने हलका होऊ शकतो. तुमचे हलके–फुलके दोन शब्द एखाद्याच्या आयुष्यात नंदनवन ठरू शकतात . आम्हा मित्रांची व्हॉट्सअॅपवरील या मेसेजनंतर एका मुद्द्यावर चर्चा अधिकच गडद झाली. आम्ही आयुष्यात काय achieve केलं?

खरंतर आम्ही सगळेच याबाबत अस्वथ आहोत. आम्ही आयुष्यात काय achieve केलं? सगळ्यांनाच जाणवतंय आयुष्याची अनेक वर्षे सरल्यानंतर आम्ही होतो तिथेच आहे. म्हणजे आयुष्य थोडं स्थिरस्थावर झालंय इतकंच. सगळ्यांसारखं हप्ते फेडून घर झालंय, मुलं, त्यांची लग्न वगैरे–वगैरे. ही पटकथा थोड्याबहुत फरकाने सगळ्यांची सारखीच आहे. मग आम्ही वेगळं काय केलं? प्रत्येकात काहींना काही टॅलेंट आहे, परंतु wiki च्या पेज वर येण्याइतकीही ओळख नाही. किमान स्वतःला स्वतःबद्दल आनंद वाटेल इतपतही स्वतःची ओळख नाही. सुखाच्या सामाजिक व्याख्येप्रमाणे खरंतर सगळे सुखी. तरीही सगळेच अस्वस्थ आहेत. मला वाटतंय त्यांच्यात जे सुप्त टॅलेंट आहे, त्याला फुलवण्याचा त्यांनी कधी प्रयत्नच केलेला नाही. हे करताना आपल्यात काही वेगळं आहे, याची जाणीव फार प्रकर्षाने मात्र झाली पाहिजे. हे झालं नाही तर मात्र तुम्ही न्यूनगंडाने पछाडले जाल. कुणी काही वेगळं करत नसतं, फक्त वेगळ्या पद्धतीनं आपल्या समोर सादर करत असतं. उदाहरणं द्यायची झाली, आपल्या अवतीभोवतीच अनेक आहेत. कापडाची अनेक दुकानं असूनही त्याच्या शेजारीच नवीन दुकान सुरू करणारा व्यापारी आपणात काहीतरी वेगळं आहे, या आत्मविश्वासाने सुरू करत असतो. नवीन चित्रपट आणणारा दिग्दर्शक, चित्रपटाचा विषय सारखाच असला तरी आत्मविश्वासाने सांगत असतो, त्यांच्या चित्रपट वेगळा आहे. हा आत्मविश्वास त्यांना काहीतरी वेगळा करण्यास प्रवृत्त करतो. सैराटची कथा आजवर आलेल्या अनेक चित्रपटात होती, परंतु त्याचं वेगळपण सादरीकरणात होत आणि आपण काहीतरी वेगळं करतोय याबाबत दिग्दर्शकाच्या मनात असलेल्या आत्मविश्वासात.

आम्हाला जो प्रश्न सतावतोय, आम्ही आयुष्यात काय achieve केलं? तो तिथेच घुटमळतोय कारण प्रत्येकात काही वेगळं आहे, हे स्वीकारायला कुणीही तयार नाही. ते वेगळं काय याचाही शोध त्यांना घेता येत नाही आणि जे जाणवतंय त्यासह पुढे वाटचाल करण्याची इच्छा एका सुरक्षित जीवनपद्धतीच्या रेट्यापुढे क्षीण झालीय. संघर्ष जो मनात येतो तो काही क्षणापुरता, त्याची धग बनून तो धुमसत राहत नाही. आयुष्याचं साचलेपण दुर्दैवाने अधिक मोहित करतंय. काहीतरी वेगळं करण्याची, ओळख निर्माण करण्याची इच्छा असूनही.

आयुष्याचा गर्भित अर्थ समजून घेणं म्हणजे आपलेच जगण्याचे मार्ग कुंठित करण्यासारखं आहे. काहींनी न उमजून, त्यापासून दूर जाऊन विरक्तीच घेतली. आयुष्याचे अर्थ उकलत न बसता, मनानं घेतलेल्या ध्यासासोबत वाहत जाणं ज्यांना जमलं आहे, त्यांनीच आयुष्यात काहीतरी achieve केल्याची अनेक उदाहरणे आहेत. आम्हाला वाटू लागलंय आयुष्याचं हे प्रवाहीपण जाणून त्याबरोबर वाहत जाणे हेच आयुष्य जगण्याचं सूत्र आहे, काहीतरी achieve करण्याचा मार्ग आहे. आपलं असणं हे अपूर्णतेचं लक्षण आहे, कारण ते निर्णायक नाही असं आपल्याला वाटतं. हेच कारण आहे आपण सतत अस्वस्थ असतो. परिपूर्णतेच्या ध्यासापोटी. आपली एक ओळख निर्माण करण्यासाठी ज्याला आपण काही achieve करणं म्हणतो, परंतु त्यासाठी जी सुरुवात करावी लागते ती करण्यास आपण तयार नसतो. आपल्यासमोर जो असतो तो मोठा कॅनवास असतो. त्याच्या भव्यतेनेच आपण थिजून जातो. रंगाचे काही शिंतोडेच ते तयार करतात हे आपण विसरतो.

डॉक्टर आनंद नाडकर्णी यांनी सुंदर शब्दात याचं विवेचन केलं आहे. जे आपल्या कंट्रोलमध्ये आहे ते प्रथम करा. एखादा कॅनवास तयार करायला सुरुवात म्हणून प्रथम रंगाच्या काही शिंतोड्यांनी सुरुवात करणे ही तर आपल्या कंट्रोलमधील गोष्ट आहे. आम्हा सर्वांना जाणवलं ती सुरुवातच तर आम्ही करत नाही आहोत, जे कंट्रोलमध्ये आहे त्याचीसुद्धा. आपल्याला मृत्यूची चाहूल लागली तर आपण नेटाने काही अपूर्ण गोष्टी पूर्ण करण्याचा प्रयत्न अधाशीपणानं नक्कीच करू. हे अधाशीपण जगण्यात रुजवणं फार गरजेचं आहे. जगण्याशी विरक्त होऊन तटस्थपणे पाहणे त्यामानाने सोपं असावं म्हणून अनेकांनी हीच जगण्याची पद्धती अंगिकारली असावी, परंतु जे अस्वस्थ आहेत आपली ओळख निर्माण करण्यासाठी, त्यांना मात्र त्यांच्या कंट्रोलमध्ये असलेल्या छोट्या गोष्टींनी, आयुष्य म्हणजे काहीतरी गूढ, अगम्य आहे, याचा फारसा विचार न करता काहीतरी achieve करण्यासाठी आयुष्यातील प्रवाहीपणच तारू शकेल. मग स्वतःला आनंदी करण्याचे मार्ग शोधा, नाहीतर दुसऱ्याला आनंदी करण्याचा. एक मार्ग नाही रुचला, तर दुसरा निवडा; पण थांबू नका. आयुष्याच्या प्रवाहीपणातच achievement चा राजमार्ग आहे, असं आम्हा सर्वांना आता वाटू लागलंय. पुन्हा गीतेतील ते सुंदर वाक्य आठवतं, त्यातच जीवनाचं सार आहे, याबद्दल शंका नाही.

*कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन...*

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# बच्चनजी आणि मी


**सरकारी नोकरी ही केवळ आर्थिक सुरक्षितता नसते, तर ती अनेक संधी देणारी यंत्रणा असते. ज्याला रुपेरी पडद्यावर बपूल आयुष्याचे आराखडे बांधले, असा महानायक आपल्यासमोर आल्यावर नोकरीचे सार्थक झाले, असे वाटले तर नवल काय? महानायक अमिताभ बच्चन यांच्या कार्यक्रमाचे वृत्तांकन करताना मनात उठलेले हे तरंग...**

**इर्शाद बागवान**

अमिताभ बच्चन माझा प्राणपिय हिरो, लहानपणापासूनच महानायक बचन यांच्या एक ना अनेक चित्रपटांनी माझं भावविश्व व्यापलं आहे. लहानपणी पागरी (ता. बार्शी, जि. सोलापूर) इथल्या भारत व्हिडीओ सेंटरवर नित्रासमवेत बचन यांच्या किती चित्रपटांची पारायणं केली असतील याची गणती होणं कठीण आहे. त्या वेळी बच्चन यांचा शक्ती, दिबार, गोले, तुफान, गंगा जमुना सरच्यती, अमर अकबर अँथोनी, शहेनशहा, जंजीर, डॉन, कुली, मर्द, लावारिस, कालिया, शराबी, मुकद्दर का सिकंदर, नमक हराम, शान, अग्निपथ, खुदा गवाह अशा एक ना अनेक चित्रपटांनी कायम अधिराज्य गाजवलं, त्या वेळी बच्चन म्हणजे आम्हाला आमचेय प्रतिनिधी वाटायचे. ते कधी तुफान वाटायचे, कधी मर्द वाटायचे, कधी कुली राटायचे, तर कधी खरेखुरे डॉन वाटायचे. त्याचं हे प्रत्येक पात्र मनावर कायमस्वरूपी कोरलं गेलं आहे.

## मी कृतकृत्य

अमिताभ बच्चन यांना भेटण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची आणि त्यांच्यासमवेत एखादा फोटो काढण्याची इच्छा नाही, असा एकही चित्रपट शौकीन संपूर्ण देशात सापडणार नाही. किंबहुना अमितींना प्रत्यक्षात नुसतं पाहिलं तरी त्यांचे अनेक चाहते कृतकृत्य होतात. त्यामुळेच जुहूतील त्यांच्या जलसा बंगल्यासमोर चाहत्यांची नेहमीच गर्दी उसळलेली असते, मीही त्यांचा असाच एक वेडा चाहता आहे. २००८ साली मी मंत्रालयातील नोकरीच्या निमित्ताने मुंबईत आलो. तेव्हापासून अमितजींना प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा बाळगून होतो; पण बराच प्रयत्न करूनसुद्धा ७ वर्षात तो योग आला नव्हता. २०१६ या वर्षात मात्र हा श्रोबस् असा जुळून आला. या वर्षात अमितजींना दोन वेळा प्रत्यक्षपणे आणि एक वेळा त्यांची वैयक्तिक भेट घेण्याची संधी मला मिळाली.



## अनोखी संधी

माझ्या या प्राणप्रिय हिरोला प्रत्यक्षात पाहण्याचा या वर्षात माझा तिरुन योग नुकताच मंत्रालयात, तोही आमच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या अखत्यारित असलेल्या मिनी थिएटरमध्ये तुझ आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉर्पोरेट कंपन्यांच्या सहकार्यातून राज्यातील ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी 'व्हिलेज सोहत ट्रान्सफॉर्मेशन' ही मोहीम हाती घेतली आहे. यासंदर्भात नुकतीच त्यांन बस एक उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीस महानायक अमिताभ बच्चन व इतर उपस्थित होते. या बैठकीनंतर श्री बच्चन महोदयांनी मिनी थिएटरमध्ये पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषदेस त्र्यांसमवेत अमितजी उपस्थित होते. या २ परिषदेच्या आयोजनानिमित्त मला यात राहता आले आणि या वर्षातला अमितजींना पाहण्याचा तिसरा योगही साधता आला. मिनी थिएटरमध्ये सगळ्या मान्यवरांसमवेत अमितजी आले, तेव्हा मी त्यांना पाहतच राहिलो. मी यापूर्वी त्यांना गिरगाव चौपाटी येथे 'मेक इन इंडिया' परिषदेच्या निमित्ताने झालेल्या 'महाराष्ट्र रजनी' कार्यक्रमात आपल्या भारदस्त आवाजात 'महाराष्ट्र गौरवगीत' सादर करताना पहिल्यांदा पाहिले होते. ज्या हिरोवर लहानपणापासून प्रेम केले, त्याला प्रत्यक्ष पाहण्याचा तो क्षण अविस्मरणीय होता. त्यानंतर पार्ले येथे त्यांच्या 'तीन' या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी झालेल्या कार्यक्रमात त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचा, त्यांच्याशी संवाद साधण्याचा आणि त्यांच्यासमवेत सहकुटुंब फोटो काढण्याचा योग आला होता.

## अमितजींच्या हस्ते गौरव

माझा लहान बंधू इम्रानने डिझाइन केलेल्या पोस्टरला या कार्यक्रमात अमितजींच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर आम्ही अमितजींची सहकुटुंब भेटलो. या वर्षातला हा दुसरा सुवर्णयोग होता आणि मंत्रालयात माझ्याच विभागात अमितजींचं येणं हे माझ्यासाठी फारच आनंददायी असं होतं. मंत्रालयात आलेल्या अमितजींनी नेहरू शर्ट, त्यावर गडद निळ्या रंगाचा जॅकेट, पायजमा आणि पायात लाल रंगाचे शूज असा साधा पेहराव केला होता. व्यासपीठावर ते मान्यवरांसमवेत विराजमान झाले. पत्रकार परिषद सुरू झाली. प्रश्नोत्तरांची सरबत्ती सुरू झाली. मी माहिती ऐकून घेण्याबरोबरच मधूनमधून माझ्या लाडक्या हिरोला न्याहाळत होतो. त्यांना कितीही पाहिलं तरी माझं मन भरत नव्हतं. त्यांचं राहणीमान, त्यांची साधी वेषभूषा, त्यांची केशभूषा, त्यांचं व्यक्तिमत्त्व या साऱ्यांचा माझ्यावर पुन्हा एकदा प्रभाव पडला होता. त्यांना तिसऱ्यांदा पाहूनसुद्धा त्यांच्याविषयीचं आकर्षण जराही कमी झालं नसल्याचं मला इथं प्रकर्षानं जाणवलं. मी त्यांना पाहतच राहिलो. तसं पाहिलं तर मंत्रालयात नोकरीला लागल्यापासून सेलिब्रेटींना नेहमीच भेटत असल्याने याविषयीचं आकर्षण थोडंफार कमी झालं आहे; पण अमितजींना भेटत राहण्याची बालपणाची ती इच्छा मात्र अजूनही कमी झालेली नाही. लहानपणी मित्रांसोबत मायापुरी मासिकातले पत्ते शोधून आम्ही अनेक हिरोंना पत्रं लिहीत असू, यात सर्वाधिक पत्रं आम्ही अमितजींना लिहिली होती. मंत्रालयात झालेल्या अमितजींच्या भेटीने बालपणातल्या त्या सगळ्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या...

**(लेखक हे साहाय्यक संचालक आहेत.)**

# स्वप्नांना पंख : सोनाली देसाई यांची यशोगाथा

**मुकुंद लता मधुकर चिलवंत**

***समाजात महिलावर्ग प्रत्येक क्षेत्रात ठसा उमटवत आहे. व्यवसायाच्या क्षेत्रातही महिलांनी मोठ्या धैर्याने, मेहनतीने आणि आत्मविश्वासाने उत्तुंग भरारी घेतली आहे. अशीच एक प्रेरणादायी कहाणी आहे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील सोनाली देसाई-मसूरकर यांची.***

वडिलांना आधार द्यायच्या उद्देशाने व्यवसायात पाऊल ठेवणाऱ्या सोनाली यांनी काही वर्षांत स्वतःचा वेगळा ठसा निर्माण केला आणि स्वतःचा ब्रँड उभारला. त्यांच्या यशामागे वडील प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन, त्यांच्याकडून मिळालेली शिकवण आणि कष्टाची प्रेरणा आहे.

प्रभाकर देसाई यांनी सुरुवातीला एमआयडीसीमध्ये व्यवसाय सुरू केला. निवृत्तीनंतर मुलाकडे तो व्यवसाय सोपवून स्वतः नव्याने काहीतरी करण्याचा निर्णय घेतला. याच काळात माडखोल (ता. सावंतवाडी) येथे त्यांनी डेअरी व्यवसाय उभारला. या व्यवसायातूनच सोनाली यांना या व्यवसायाचे बाळकडू मिळाले.

सोनाली यांच्या या उद्योगामध्ये प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा मोठा आधार मिळाला आहे. या योजनेचा मुख्य उद्देश अन्नप्रक्रिया क्षेत्राला बळकटी देऊन लाभार्थ्याला स्वत:च्या पायावर उभे करणे हा आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील उद्योजकांना मोठा आधार मिळत आहे. त्यांनी या योजनेचा लाभ घेत आपला व्यवसाय यशाच्या शिखरावर पोहोचवला आहे. सोनाली यांना सुरुवातीला अनेक चढ-उतारांचा सामना करावा लागला; पण त्या हार मानणाऱ्यांपैकी नव्हत्या. अडचणींवर मात करत त्यांनी सावंतवाडीत एक छोटे दूध विक्री केंद्र सुरू केले. मात्र त्यांनी फक्त दूध विक्रीत न थांबता, त्यासोबत विविध दुग्धजन्य पदार्थांची विक्रीही सुरू केली.

सुरुवातीला छोटा व्यवसाय होता, परंतु दृष्टी मोठी होती. वडिलांच्या साथीने आणि स्वतःच्या कष्टाच्या जोरावर सोनाली यांनी हा व्यवसाय हळूहळू वाढवला. मागे हटायचे नाही, अडचणींना घाबरायचे नाही या ठाम निर्धाराने त्या पुढे चालत राहिल्या. आज त्या स्वतः उभ्या आहेतच; पण त्यांच्या व्यवसायातून इतरांनाही रोजगार देऊन स्वावलंबी बनवले आहे.

सोनाली यांचा प्रवास हा फक्त व्यवसायाची कहाणी नाही; तो धैर्य, आत्मविश्वास आणि कष्टाचा संगम आहे. वडिलांच्या मार्गदर्शनातून सुरुवात करून स्वतःच्या मेहनतीने स्वप्नांना आकार देत, अनेकांसाठी प्रेरणा ठरणारी अशी ही यशोगाथा आहे.

## महाराष्ट्राबाहेरही विस्तार

सोनाली देसाई यांची वाटचाल ही चिकाटी, परिश्रम आणि आत्मविश्वास यांची खरी कहाणी आहे.

उच्च शिक्षण पूर्ण करून त्यांनी आधी नोकरीत मार्केटिंगची जबाबदारी सांभाळली. तेथे मिळालेला अनुभव त्यांच्या पुढील प्रवासाला दिशा देणारा ठरला. बी.फार्मनंतर एमबीएची पदवी, व्यावसायिक दृष्टिकोन आणि कामाचा अनुभव या सगळ्यामुळे सोनालींनी ठरवलं की, आता स्वतःच्या गावातून काहीतरी मोठं करायचं.



वडिलांनी लहानशा स्वरूपात सुरू केलेल्या दूध व्यवसायाला पुढे नेण्याचा ध्यास त्यांनी घेतला; पण या वाटचालीत संकटे कमी नव्हती. फॅक्टरी उभारणे, यंत्रसामग्री बसवणे, वित्तपुरवठा मिळवणे या प्रत्येक टप्प्यावर अडथळे आले. समाजाने प्रश्नही विचारले हे काम महिलांनी कसं करणार? आर्थिक चढ-उतारांचा ताण सतत जाणवत होता, अपयशाची चवही चाखावी लागली.

सोनालींनी कधी हार मानली नाही, कारण त्यांना ठाम विश्वास होता. आपल्या गावातून, आपल्या गाई-म्हशींच्या शुद्ध दुधातूनही मोठा उद्योग उभा राहू शकतो. आज त्या विश्वासाचीच ही फलश्रुती आहे की 'देसाई डेअरी'चे उत्पादन महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता गोवा, कर्नाटक, आंध्र प्रदेशसारख्या राज्यांत पोहोचले आहे.

त्यांच्या प्रयत्नांमुळे केवळ व्यवसाय नाही, तर आपल्या गावातील आणि जिल्ह्यातील असंख्य शेतकऱ्यांना नवी उमेद मिळाली आहे. सोनालींची कहाणी ही प्रत्येक त्या स्त्रीसाठी प्रेरणादायी आहे, जी स्वप्न पाहते आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने झगडते.

'लेट' ब्रँडचा प्रवास - गावातून राज्याबाहेरपर्यंत

सोनाली देसाई यांच्या आयुष्यातील एक मोठं पाऊल म्हणजे ‘लेट’ (Laite) ब्रँडचा जन्म.

दुधापुरता व्यवसाय मर्यादित न ठेवता त्यांनी दही, लोणी, ताक, तूप यासारख्या दर्जेदार उत्पादनांची निर्मिती सुरू केली. मात्र फक्त उत्पादन तयार करून थांबायचं नाही, तर त्याला एक वेगळी ओळख द्यायची होती. ग्राहकांच्या मनात कायम घर करून राहील, असं नाव शोधण्याची धडपड सुरू झाली आणि त्यातूनच जन्म झाला ‘लेट’ या नावीन्यपूर्ण व लक्षवेधी ब्रँडचा.

आज ‘लेट’ ब्रँडची उत्पादने केवळ सिंधुदुर्गापुरती मर्यादित नसून कोल्हापूर, सातारा, पुणे, मुंबईसह महाराष्ट्राबाहेरील राज्यांतही आपली छाप सोडत आहेत. गावाकडच्या छोट्याशा फॅक्टरीतून सुरू झालेला प्रवास आज शहरांच्या मोठ्या बाजारपेठेत पोहोचला आहे. सोनालींच्या मार्केटिंगच्या अनुभवाचा यामध्ये मोठा वाटा आहे. त्यांनी स्वतः गोव्यातील मोठ्या हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्समध्ये जाऊन आपल्या उत्पादनाची चाचणी करून दाखवली. पनीरच्या गुणवत्तेबद्दल त्यांनी जेव्हा विश्वास निर्माण केला, तेव्हा सुरुवातीच्या ५० किलो मागणीवरून आज दररोज २०० किलो ऑर्डरपर्यंत वाढ झाली. एवढंच नाही, तर सध्या दररोज तब्बल ७०० किलो मलई पनीर बंगळुरूसारख्या महानगरात ‘लेट’ ब्रँडअंतर्गत पोहोचत आहे.

या यशामागे फक्त सोनालींचा ध्यास नाही, तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचं योगदानही तितकंच मोलाचं आहे. व्यवसायात जेव्हा–जेव्हा अडचणी आल्या, तेव्हा वडील प्रभाकर देसाई आणि इतर सर्व कुटुंबीय एकसंधपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले. आज ‘लेट’ हा केवळ एक ब्रँड नाही, तर गावातील मेहनती शेतकऱ्यांचं शुद्ध दूध, सोनालींचा आत्मविश्वास आणि कुटुंबाच्या पाठिंब्याची गाथा आहे.

गावातून उगम पावलेला हा प्रवास राज्याबाहेर पोहोचत असताना प्रत्येक ग्रामीण उद्योजकासाठी एक जिवंत प्रेरणादायी उदाहरण बनला आहे. माझा प्रवास हा केवळ उद्योग उभारणीचा नाही, तर महिलांच्या सशक्तीकरणाचा आहे, असे सोनाली देसाई ठामपणे सांगतात. त्यांच्या मते, ग्रामीण भागातील महिला योग्य नियोजन, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर नक्कीच यशस्वी उद्योगपती होऊ शकतात. अनेक तरुणी, गृहिणी, शेतकरी महिला जर त्यांनी स्वतःवर विश्वास ठेवला आणि जिद्दीने पुढे चालत राहिल्या, तर त्या आपल्या स्वप्नांना नक्कीच गाठू शकतात.

सोनालींच्या दृष्टीने ग्राहकांना शुद्धतेचा विश्वास देणे हेच त्यांचे खरे ध्येय आहे आणि आज तो विश्वासच त्यांची खरी कमाई ठरली आहे. त्यांची ही कहाणी म्हणजे केवळ व्यवसायातील यश नव्हे, तर मेहनतीची शिदोरी, जिद्दीची वाटचाल आणि आत्मविश्वासाची कमाई आहे. सोनालींची यशोगाथा ही एका मुलीच्या स्वप्नांची, तिच्या वडिलांच्या विश्वासाची आणि संपूर्ण कुटुंबाच्या नात्यांची कहाणी आहे. ही कहाणी त्या प्रत्येक स्त्रीची आहे, जी आपल्या कुटुंबाच्या पाठिंब्यावर, आत्मविश्वासाच्या बळावर आणि अथक परिश्रमाच्या जोरावर स्वतःची ओळख निर्माण करते. आज सोनालींचं यश हे फक्त त्यांचं वैयक्तिक समाधान नाही, तर गावातील, जिल्ह्यातील आणि संपूर्ण समाजातील असंख्य महिलांसाठी एक जिवंत प्रेरणा आहे.

**(जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग.)**

**प्रवीण टाके**

कोल्हापूर म्हटले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे उमदे व्यक्तिमत्त्व डोळ्यांपुढे येते. श्री अंबाबाई, श्री जोतिबा, गडकिल्ले, जंगल, घाट, वने, धरणे, तांबडा–पांढरा आणि येथील खाद्य संस्कृती डोळ्यांपुढे येते. मात्र, आता हे शहर लवकरच आणखी एका वेगळ्या वैशिष्ट्यासाठी ओळखले जाणार आहे, ते म्हणजे कोल्हापूरची चित्रनगरी. राज्य शासनाने मुंबईतील गोरेगाव फिल्मसिटी, हैदराबादच्या रामोजी फिल्मसिटीप्रमाणेच कोल्हापूरच्या चित्रनगरीचा विकास करण्याचे निश्चित केले असून, मोठ्या प्रमाणात या ठिकाणी विकासकार्य हाती घेतले आहे.

# कोल्हापूर चित्रनगरी विकासाच्या वाटेवर

कोल्हापूरची चित्रनगरी नव्या जोमाने, नव्या रूपात, नव्या दमात उभी राहत आहे. कोल्हापूर आणि चित्रपट निर्मिती याचे नाते जुनेच आहे. इथल्या मातीत चित्रपट प्रेम रुजले आहे. शाहू महाराजांसारख्या कलासक्त माणसाच्या मशागतीत तयार झालेल्या या शहराने चित्रपटाशी आपले नाते कायम ठेवले आहे. शहराचे नाव इथल्या मातीत रुजलेल्या चित्रपट प्रेमामुळेही खास आहे. दिग्दर्शक, निर्माते, लेखक, तंत्रज्ञ यांच्यासाठी कोल्हापूर ही केवळ एक जागा नसून, एक शाळा आहे, असे वक्तव्य नुकतेच ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी राजर्षी शाहू महाराज जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना केले. त्यांच्या या विधानातून कोल्हापूरच्या चित्र सांस्कृतिक वारशाचा गौरव अधोरेखित होतो.

कोल्हापूरने भारतीय चित्रपटसृष्टीला भालजी पेंढारकर, राजा परांजपे, बाबुराव पेंटर, व्ही. शांताराम, अरुण सरनाईक, बाळकृष्ण नरके,चंद्रकांत, सूर्यकांत मांढरे, मास्तर विनायक, बाबुराव पेंढारकर, अनंत माने, सुलोचना, आशा काळे, उषा नाईक अशा कितीतरी दिग्गजांची देणगी दिली आहे. दादा कोंडके, लता मंगेशकर आणि मंगेशकर भगिनी, राजदत्त यांच्यासह दिग्गज संगीतकार, संगीतसूर्य केशवराव भोसले अशा कितीतरी नावांनी कोल्हापूरचे नाव सिने – नाट्य क्षेत्रामध्ये अजरामर केले आहे. अनेक कलाकारांसाठी त्यांच्या आयुष्यात कोल्हापूर हे कलाक्षेत्राचे उगमस्थान ठरले आहे. यामध्ये प्रभात फिल्म कंपनीचा नामोल्लेख आवश्यक ठरतो. कोल्हापूरने शालिनी सिनेटोन, जयप्रभा स्टुडिओचाही एक सुवर्णकाळ अनुभवला

आहे. चित्रपट कसा तयार करायचा हे तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी चेन्नईपासून कराचीपर्यंतचे अनेक मंडळी पूर्वीच्या काळी कोल्हापूरला येत असत. गांधी पिक्चरसाठी पहिले ऑस्कर मिळवलेले भानु आथय्या मूळचे कोल्हापूरचे. ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके यांची कारकीर्दही कोल्हापुरातून सुरू झाली. एवढेच काय पृथ्वीराज कपूर, राज कपूर यांनीही भालजी पेंढारकर यांच्या चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. त्यामुळे कोल्हापूरचे नाव चित्रपटांपासून वेगळे करता येत नाही.

या चित्रनगरीमध्ये गेल्या तीन वर्षांत असा कोणताही दिवस गेलेला नाही, ज्या दिवशी शूटिंग झालेले नाही. मालिका, सिनेमे, प्रादेशिक चित्रपट यांच्या चित्रीकरणाने हे स्थळ सदैव गजबजलेले असते. मुंबईतील शूटिंगला लागणारी परवानगी प्रक्रिया, खर्च आणि गर्दी यामुळे आता निर्माते पर्याय शोधत आहेत. अशा वेळी कोल्हापूरसारखी चित्रनगरी हा एक उत्कृष्ट पर्याय बनत आहे. येथील मोठ्या आकाराचे सेट, खुली जागा, कमी खर्च, स्थानिक सहकार्य आणि निसर्गरम्य वातावरण यामुळे दक्षिण भारतातील निर्मातेही येथे येऊ लागले आहेत.



राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते चित्रनगरीतील नव्या सुविधांचे उद्घाटन व लोकार्पण होत आहे. यामध्ये भविष्यातील आवश्यकतेनुसार अत्याधुनिक पोस्ट–प्रोडक्शन स्टुडिओचेही भूमिपूजन करण्यात येणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सहपालक मंत्री माधुरी मिसाळ आदींचीही उपस्थिती यावेळी असणार आहे. यामुळे या प्रकल्पास राजकीय पातळीवरही सक्रिय पाठबळ मिळत आहे.

तत्कालीन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या प्रकल्पाकडे विशेष लक्ष दिल्यामुळे पायाभूत सुविधा विकसित झाल्या. ही सुरुवात आज पुढच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. कोल्हापूरची ही चित्रनगरी आता केवळ एक चित्रपटस्थळ न राहता, रोजगार निर्मितीचे मोठे केंद्र बनत आहे. एक पर्यटन स्थळ बनत आहे. एका प्रकल्पासाठी हजारो जणांची गरज भासते. त्यामुळे कलाकार, तंत्रज्ञ, सेट डिझायनर, खानपान, हॉटेल व्यवसाय, वाहनसेवा, सुरक्षा, साउंड, लाईटिंग अशा अनेक सेवा आणि व्यवसायांना यातून चालना मिळत आहे.

हे सर्व लक्षात घेतले तर स्पष्ट होते की, कोल्हापूर चित्रनगरीचा विकास हा आता फक्त स्वप्न राहिलेले नाही, तर तो प्रत्यक्षात आकार घेत आहे. गोरेगाव फिल्मसिटी किंवा रामोजी फिल्मसिटीप्रमाणे कोल्हापूर चित्रनगरीही भविष्यात एक नवीन पर्यटनस्थळ म्हणून नावारूपाला येईल. कोल्हापूरच्या विकासात आणि सांस्कृतिक ओळखीत ही चित्रनगरी महत्त्वाची भूमिका निभावणार आहे.

एकूणच, कोल्हापूर चित्रनगरी विकासाच्या वाटेवर असून ती लवकरच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आर्थिक नकाशावर ठळकपणे झळकणार आहे.

याच चित्रप्रेमाला सन्मान देताना महाराष्ट्र शासनाने कोल्हापूरमध्ये १९८५ मध्ये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची स्थापना केली. करवीर तालुक्यातील मोरेवाडी येथील ७८ एकर जागेत ही चित्रनगरी उभारण्यात आली. मात्र, मधल्या काळात ही संस्था तोट्यात गेल्याने बंद करण्याचा निर्णयही घेतला गेला; पण कोल्हापूरकरांच्या मागणीला दाद देत शासनाने २००८ मध्ये पुन्हा चित्रनगरी पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेतला. आता मात्र कोल्हापूरची चित्रनगरी नफ्यामध्ये घोडदौड करत आहे. या चित्रनगरीला आता वेध लागले आहेत, मोठ्या बिग बजेट निर्मितीच्या कार्याचे.

चित्रनगरीचा पुनर्विकास करण्यासाठी कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार 'एमआयडीसी'ने पायाभूत सुविधांच्या विकासाला गती दिली आहे. यामध्ये अंतर्गत रस्ते, शूटिंगसाठी रेल्वे स्टेशन, चाळ, वाडा, मंदिर आदी स्थळांची निर्मिती करण्यात आली आहे. शूटींगसाठी ही स्थळे उभी झाली आहेत. दोन मोठे स्टुडिओ या ठिकाणी उभे झाले आहेत. तंत्रज्ञ, कारागीर, कलाकार व मान्यवरांसाठी दोन विश्रामगृहांचीही बांधणी झाली आहे.

**(उपसंचालक (माहिती) कोल्हापूर विभागीय कार्यालय, कोल्हापूर.)**

# ससा जिंकतोच आणि कासव हरतं?

अश्विनी शिंदे-पवार

***एके काळी आमच्या बालपणी जेव्हा मनोरंजनाची भौतिक साधने फारशी उपलब्ध नव्हती, आमच्या मुक्त बालमनाला अडथळा करणारी आजच्यासारखी व्यवधाने नव्हती, तेव्हा सर्वांच्या आवडीची एकच गोष्ट होती, ती म्हणजे...गोष्ट...कथा!***

## बालपणीचा काळ सुखाचा!

एके काळची गोष्ट आहे, आटपाट नगर होते. अशी हमखास सुरुवात असणारी एखादी दंतकथा, पुराणकथा, बोधकथा, इसापनीती अशा कित्येक प्रकारच्या कथा आपण आजवर ऐकल्या-वाचल्या असतील. आपल्या आबा-आज्यांपासून प्रत्येक पिढ्यांनी ऐकलेली गोष्ट म्हणजे ससा आणि कासवाची शर्यत...

वेगेवेगे धावू नि डोंगरावर जाऊ... असे म्हणणारा ससा आणि पाठीवरचं ओझं सावरत लुटूलुटू चालणारं कासव! यांची ही पारंपरिक कथा! ससा भारी चपळ आणि वेगवान तर कासव बिचारे संथ! सशाने ठरवली शर्यत नि चालले डोंगराकडे तडक! सशाला आपल्या वेगाची भारीच होती धुंदी! 'हळू तर हळू' म्हणत कासव मात्र सदा आनंदी!



## The woods are lovely dark deep!

ससा तिथेच फसला. गवताने त्याचा असा कापला गळा नि मग निकालच लागला वेगळा! पारंपरिक कथेत संयम आणि चिकाटीच्या बळावर कासव जिंकला होता.

जसे आमचे बालपण सरले, तसे या कथांचे अप्रूप ओसरले. मात्र जरा डोळसपणे आजूबाजूला डोकावले, तर अशा ससा-कासवाच्या शर्यती रोजच दिसून येतील. ही निव्वळ कथा नाही, तर हे आपल्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. आयुष्याचे एक गणित आहे. त्याला इतके आयाम आहेत की, तुम्ही ज्या चष्म्यातून बघाल तशी त्याला उंची आणि खोली प्राप्त झालेली दिसेल.

ससा आणि कासव हे द्वंद्व आहे, दोन भिन्न मनोवृत्तींचे! दोघांची शारीरिक गुणवैशिष्ट्ये वेगळी, त्यामुळे त्यांच्या क्षमताही भिन्न! हा संघर्ष आहे उतावीळपणा विरुद्ध संयम, बेछुटपणा विरुद्ध स्वयंशिस्त, अवास्तव अपेक्षा विरुद्ध मर्यादांची जाण, घमेंड विरुद्ध लीनता असा!

मूळ कथेत ससा हरला होता, तो अतिआत्मविश्वासामुळे! (Overconfidence) तो चपळाईने धावला खरा; पण 'उथळ पाण्याला खळखळाट फार' या म्हणीप्रमाणे हा खळखळाट... खळळ् आणि खट्याक् झाला. आत्मप्रौढी सशाला वाटले, माझ्याइतका वेगवान कुणीच नाही. त्यात त्याने प्रतिस्पर्धी निवडला एकदम दुर्बळ! म्हणजे मुळातच जी स्पर्धा झाली ती तशी तुल्यबळ स्पर्धा नव्हतीच मुळी!

'प्रतिस्पर्धी जर जिगरी आणि तुल्यबळ असेल तर हारण्यातही गौरव असतो' हे कपटाने स्पर्धा ठरवलेल्या सशाला माहीतच नाही. इतका आटापिटा करूनही त्याचे 'गर्वाचे घर खाली'च झाले. सशाला एक डुलकी काय लागली अन् थेट मग संध्याकाळच झाली!

*'लम्होंने खता की और सदियोंने सजा पायी!*

कासव मात्र खूप प्रामाणिक आणि तत्त्वनिष्ठ! जगातील छक्के-पंजे यांपासून अनभिज्ञ! *'मुझे चलते जाना है...बस चलते जाना'* या गाण्याप्रमाणे तो अविरत, अविश्रांत चालत राहिला. झोपलेल्या सशाला उठवायची तसदी मात्र त्याने घेतली नाही, कारण त्याला विजयाची संधी गमावायची नव्हती. आपल्या मर्यादांची जाण ठेवल्याने अंती कासव विजयी झाला.

आजच्या आपल्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या, एआयच्या युगात ही कथा विविध रूपके घेऊन आपल्या समोर येते. आजच्या जगात ही गोष्ट कशी घडली असती? आणि निकाल काय असता?

आजच्या स्पर्धेत केवळ ससा आणि कासवच नाहीत, तर इतर पशुपक्षी पण सहभागी झालेत. त्यामुळे शर्यतीचे निकष आणि निकाल प्रत्येक वेळी भिन्न आहेत. कुणाला धावता येते, तर कुणाला उंच उडता येते, कुणी झाडावर सरसर चढतो तर कुणी छान पोहतो, कुणी छान गातो तर कुणी छान नाचतो. म्हणूनच ही स्पर्धा परस्परांपेक्षा स्वतःशीच असलेली स्पर्धा आहे.


आजचा मॉडर्न ससा आता झोपाळू राहिला नाही. आजच्या सशाने त्याच्या आधीच्या वेगाला तंत्रज्ञानाचे पंख लावले आहेत. तो 'स्मार्ट वर्क' करतो. तो कामाच्या याद्या बनवत नाही,तर तो विश्लेषण (Analysis) करतो. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' या उक्तीप्रमाणे तो आपल्या पूर्वजांनी केलेल्या चुकांमधून शिकतो आणि शहाणा होतो. तो चपळ तर होताच; पण आता सावधही आहे. आपल्या कुवतीची त्याला जाण तर आहेच, मात्र आपल्या कमकुवत बाजूवरही त्याने काम केले आहे. त्यामुळे

आता ससा जिंकण्याच्या शक्यता अजूनच वाढत जातात.

याउलट कोषातच गुरफटलेला कासव नवीन बदल स्वीकारत नसल्याने कालबाह्य outdated झालाय. 'आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास!' म्हणूनच आज ससाच जिंकतोय, मैदान गाजवतोय. तो कमावतोय; पण.... पण तो गमावतोय...होय तो गमावतोयसुद्धा!

आजचा ससा काय गमावतोय हे आज कदाचित लक्षात येणार नाही. येणाऱ्या पुढच्या पिढ्यांना ते नक्कीच जाणवेल. आजच्या सशाने जी जीवनशैली अंगिकारली आहे, त्याने तो झटपट शिखरावर जाईलही मात्र त्याहून द्रुतगतीने त्याचे अधःपतन होऊ शकते.

पूर्वी ज्या गोष्टी सशाचा मेंदू लक्षात ठेवायचा, त्याची जागा यंत्रांनी घेतली. त्यामुळे मेंदूची कार्यक्षमता कमी होत आहे. मानवाला पूर्वी असणारी शेपूट उत्क्रांतीत अशीच लुप्त झाली होती. भाकरी मिळवण्यासाठी धावणारा ससा आज मिळालेली 'भाकरी पचवण्यासाठी' धावतोय. 'रेडिमेड'च्या जमान्यात आपले आरोग्य हरवले कुठे? जिंकण्याच्या ईर्षेने धावणाऱ्या सशाला 'STOP' च दिसत नाही. कुटुंब, नाती, संस्कार, गाव, संस्कृती असे एक-एक मैलाचे दगड मागे-मागे जात आहेत. ससा एक दिवस धावून-धावून दमेल. एक जागी थांबेल. 'कुठवर आलो' याचा विचार करेल, तेव्हा त्याला भान येईल, तेव्हा कदाचित 'संध्याकाळ' झालेली असेल. आयुष्याची संध्याकाळ! तिथून मागे फिरणे नाही. कारण आयुष्याचा प्रवास हा 'One way' आहे. म्हणूनच आजच्या सशाला किती धावायचे याचा विचार करावा.



आयुष्य ही एक लिंबू-चमचा शर्यत आहे. ज्यात जिंकायचे तर आहे; पण चमच्यामधले लिंबू न पाडता! हे 'लिंबू' सोबत न्यायचे ते म्हणजे आपली माणसे, नाती, संस्कार, नैतिकता, माणुसकी आणि पिढ्यांनी सोपवलेला वारसा!

काय फरक पडेल जर ससा क्षणभर थांबून त्या कासवाला म्हणेल, डोंगर चढताना मी पाठीवर घेईन तुला! पुढे जाऊन नदी लागली एखादी तर कासव म्हणेल सशाला, बस माझ्या पाठीवर! तुझंही शिड लावतो मी किनाऱ्याला!

ही शर्यत नेहमी ससा विरुद्ध कासव अशीच का हवी? ते एक का होत नाहीत? ससा आणि कासव मिळून एक टिम नक्कीच होऊ शकतात. ससा हे प्रतीक आहे प्रगतीचं! तर कासव हे विकासाचं! प्रगतीचा आलेख नेहमी ऊर्ध्व (upward) असतो. म्हणूनच तर ससा डोंगराकडे पळतोय, तर कासवाला मात्र वेगाइतकीच दिशाही महत्त्वाची वाटते. ससा चंचल तर कासव संयमी, दृढनिश्चयी आहे. ससा हा बेशिस्त, बेदरकार आणि बिनधास्त आहे तर कासव आहे स्वयंशिस्तीत! आपल्या आयुष्यात येणाऱ्या चढ-उतारांना तोंड देताना प्रसंगी दोन्हींचे गुण आपल्याला वापरावे लागतील.

जेव्हा हातोडा होशील, तेव्हा दणकून घाव घाल, जेव्हा ऐरण होशील, संयमाचा असू दे मनी भाव!

पिढ्यान्‌पिढ्या ससा-कासव आपल्याला वाट दाखवत राहतील. म्हणून कासवाला उचलून घेणारा ससा आणि प्रसंगी सशाला पाठीवर घेणारे कासव आपण नजरेसमोर ठेवावे.

'वेगवान म्हणजेच सर्वोत्कृष्ट' या समजुतीला ही कथा सुरूंग लावते. पुढे झेप घेण्यासाठी सिंहासारखे कधी-कधी दोन पावले मागे हटावे लागते. मात्र नेहमीच आहे त्याच स्थितीत स्थिरावला तर? 'थांबला तो संपला!' हे मात्र ध्यानी घ्यावे...

The woods are lovely, dark deep...
But I have promises to keep...
And miles to go before I sleep.

कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांच्या या काव्यपंक्तीप्रमाणे मनास भुलवणाऱ्या गोष्टींनाही जिंकता आले पाहिजे. म्हणजे खरी स्पर्धा ही स्वत:शीच असली पाहिजे. कारण 'ज्याने जिंकले स्वतःला, त्याचा तुकाराम होतो' हेच खरे!

अल्प काळासाठी ससा उत्तम ठरला, तरी जेव्हा दूरवरचा पल्ला गाठायचा असेल, तेव्हा टिकून राहण्याची क्षमता हवीच! कासवासारखी चिकाटी आणि मानसिकता हवी. स्पर्धेत उतरण्यापूर्वीच आपण यशापयशाचे भाकित करता कामा नये. प्रतिस्पर्ध्यापेक्षाही विजयासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली मानसिकता होय! कारण अर्धी लढाई मनातच जिंकली जाते आणि उरलेली अर्धी मैदानावर! 'डर के आगे जित है.... असं म्हणत आपल्या मर्यादांची जाण असतानाही कासवाने क्षमता पणास लावली आणि जिंकलासुद्धा! कारण ती आत्मप्रेरणा होती. तो एकाग्र (focused) होता. त्याच्या कृतीवर बाह्यगोष्टींचा परिणाम नव्हता. आपल्या अल्पवेगाचा न्यूनगंड त्याने भिरकावून दिला होता. वेळप्रसंगी कासव आपले डोके, पाय आत घेतो आणि पाठीची ढाल करतो.

आजचा ससा कपटाने, ईर्षेने, सत्तेच्या जोरावर जिंकत असेलही; पण त्या जिंकण्याचे समाधान त्याला मिळणार नाही. 'कोण जिंकलं' याइतकंच 'कसा जिंकला' हेही तितकेच महत्त्वाचे आहे. तुम्ही कासव असा अगर ससा... कोणत्या प्रसंगी कोणते रूपडे धारण करायचे, हे सर्वस्वी आपल्या हाती आहे. शेवटी जिंकणे म्हणजे प्रत्येक लढाई जिंकणे नव्हे, तर अंतिमतः विजयी होणे आहे. आपण कुठे आलो यापेक्षा 'कुठून कुठे आलो' आणि 'आपल्यासोबत कुणाला' घेऊन आलो. हेसुद्धा यशाचे परिमाणच आहे.

आपल्यासोबत चालणाऱ्या एखाद्या कासवाला आपण (ससा) वेळप्रसंगी पाठीवर घेऊन जाऊ शकलो तरच तो ससा खरा विजयी असे मला वाटते!

**(एसटीओ, बांद्रा कार्यालय.)**

# टायटॅनिकमधून प्रवास करताना...








**नीता कुरणे**

टायटॅनिक म्युझिअम इतिहासात घडलेल्या घटनांवर आधारित चित्रपट बघितल्यानंतर आपल्याला अनेकदा त्या घटना माहीत होतात. सन १९९७ मध्ये प्रदर्शित सत्य घटनेवर आधारित टायटॅनिक चित्रपटामुळे टायटॅनिक जहाजाची मनाला चटका लावणारी गोष्ट मला माहिती झाली. १५ एप्रिल १९१२ ला पहिल्याच प्रवासादरम्यान टायटॅनिक जहाज हिमनगाला धडकल्याने जहाजाचे तुकडे झाले आणि समुद्रात बुडले. या सत्य घटनेच्या पार्श्वभूमीवर फुललेली काल्पनिक प्रेमकथा या चित्रपटात दर्शविण्यात आली होती. मी पण हा चित्रपट बघितल्यावर चित्रपटाने माझ्या मनात घर केले आणि मग मी त्या घटनेविषयी अधिक-अधिक माहिती गोळा करायला सुरुवात केली. टायटॅनिक जहाज नेमके कुठे बुडले, कसे बुडले इ.इ. आतादेखील या जहाजाचे तुकडे कॅनडाजवळ उत्तर अटलांटिक महासागरामध्ये आढळतात.

इंग्रजीमध्ये एक शब्द आहे wanderlust. मी देखील तशीच आहे. माझ्यातील भटकंतीची भावना मला स्वस्थ बसू देत नाही आणि मग मी देश, विदेशात भटकंती करायला निघते. मागच्या वर्षी असेच मुक्तपणे भटकायला मी युके म्हणजेच युनायटेड किंगडम येथे गेले होते. युनायटेड किंगडमचे प्रामुख्याने चार भाग पडतात. इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि नॉर्थदन आयलंड या सर्व ठिकाणी जाण्यासाठी युके व्हिसा घ्यावा लागतो. यापैकी नॉर्थदन आयलंडची राजधानी असलेल्या बेलफास्ट शहरातील शिपयार्ड म्हणजे टायटॅनिक जहाजाची जन्मभूमी. तिथेच परिकथेतील जहाजासारख्या सुंदर आणि विशाल टायटॅनिक जहाजाची निर्मिती करण्यात आली होती. टायटॅनिकच्या दुर्घटनेनंतर आता तिथे फार मोठे आणि प्रचंड असे टायटॅनिक म्युझिअम उभारण्यात आले आहे.

मुंबईहून प्रथम आम्ही लंडनला गेलो आणि लंडनहून बेलफास्टला पोहोचलो. बेलफास्टच्या टायटॅनिक क्वार्टर या भागामध्ये टायटॅनिक हॉटेल, टायटॅनिक म्युझिअम इ. अनेक बिल्डिंग उभारण्यात आल्या आहेत. टायटॅनिक म्युझिअमच्या मुख्य इमारतीत एकूण सहा मजले आणि ९ दालने आहेत. त्यामध्ये ठेवलेल्या विविध मॉडेल्सद्वारे टायटॅनिक जहाज आणि बेलफास्ट बंदराची गोष्ट दृक्श्राव्य माध्यमातून आपल्यासमोर सादर करण्यात येते. म्युझिअमच्या आत प्रवेश करताच प्रवेशद्वाराजवळची ६० फूट उंचीची कृत्रिमरीत्या ऑक्सिडाईज स्टिल पॅनेलनी बनविलेली भव्य भिंत टायटॅनिक जहाज ज्या स्टिलने बनविले होते, त्यासारखी बनविली आहे.

## शिपयार्ड राईड/द डार्क राईड

पहिल्या मजला १९ आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला बेलफास्ट बंदरात चालणारे विविध व्यवसाय, मुख्यत्वे करून नंतर









बेलफास्ट बंदर जहाजबांधणीसाठी कसे प्रसिद्ध झाले, याची माहिती सांगणारा आहे. येथे जहाजबांधणी कशी होते, हे दर्शविणारी विविध मॉडेल्स ठेवण्यात आली आहेत. १९ आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील जहाज बांधणी, जहाज प्रवास, जहाजाची तिकीटे या सर्व वस्तू तिथे प्रदर्शित केल्या आहेत.

पुढे सरकताच १९ व्या शतकातील एक लिफ्ट आपल्याला टायटॅनिकच्या जहाज बांधणी कक्षात घेऊन जाते. तिथल्या शिपायार्ड राईडमध्ये बसून टायटॅनिकचे बांधकाम कशाप्रकारे केले होते, शिपयार्डमध्ये काम करणारे कामगारांनी इतके सुरेख आणि भव्य दिव्य जहाज कशाप्रकारे बांधले, त्या प्रवासातील विविध टप्पे, त्यांचे अनुभव यांचे मॉडेलद्वारे केलेले वर्णन बघून आपण मंत्रमुग्ध होऊन जातो.

जवळपास २ ते २.५ वर्षांच्या कालावधीनंतर टायटॅनिक जहाज बांधून पूर्ण झाले आणि ३१ मे १९११ रोजी टायटॅनिकचे लॉन्च करण्यात आले. लॉन्चच्या दिवशी आयोजित केलेली पार्टी, स्वप्नवत जहाज बघण्यासाठी आलेल्या लोकांची गर्दी इ. सर्व फोटो आणि व्हिडीओ बघत आपण एका मोठ्या दालनात पोहोचतो. या दालनात



आपल्या भोवतालचे स्क्रिन अशा पद्धतीने फिरवतात की, आपण प्रत्यक्ष टायटॅनिक जहाजावर फिरत असल्याचा अनुभव येतो. त्यानंतर जहाजातील सुंदर फर्स्ट क्लास केबीन, सेकंड क्लास केबीन इ.मधील फर्निचर कसे होते, सोयी-सुविधा कशा होत्या, याचे मॉडेल्स आणि प्रत्यक्ष टायटॅनिक जहाजातील डिनर सेट, कपबशा, ट्रे इ. भांडी आणि इतर अनेक वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत.

टायटॅनिकचा पहिलाच प्रवास इंग्लंडच्या साऊथ हॅमटंन येथून सुरू झाला, त्या दिवशी इतिहासातील मोठ्या जहाजातून प्रवास करण्यासाठी उत्सुक असलेले प्रवासी यांच्या मुलाखती कोण-कोण प्रवासी होते, याचे वर्णन, त्यांचे फोटो आणि व्हिडीओ बघत पुढच्या दालनाकडे आपण सरकतो. इंग्लंडच्या साऊथ हॅमटंननंतर फ्रान्स आणि आयर्लंड येथील प्रवासी घेण्यासाठी टायटॅनिक जहाजाने दोन स्टॉप घेतले आणि जवळपास २,२२४ प्रवासी घेऊन नंतर ते न्युयॉर्कसाठी रवाना झाले.

आतापर्यंत टायटॅनिकचा ४ दिवसांचा प्रवास पूर्ण झाला होता. १४ एप्रिल १९१२ ची रात्र झाली, जहाजावरील रेडिओ ऑपरेटरना पुढे हिमनग असल्याबाबतचे संदेश मिळत होते; परंतु जहाजावरील रेडिओ ऑपरेटर यंत्रणेमध्ये एक दिवस आधीच थोडासा तांत्रिक बिघाड झाला होता आणि जहाजातील अतिश्रीमंत प्रवाशांचे संदेश पोहोचवण्यामध्ये यंत्रणा व्यस्त असल्याने त्यांनी हिमनग असल्याच्या संदेशांकडे कानाडोळा केला असावा, असा अंदाज व्यक्त केला जातो. त्यानंतर जशी-जशी रात्र झाली, तसे सर्व प्रवासी झोपी गेले. बाहेर वातावरण अतिशय थंड होते. बोचरा वारा वाहत होता. त्या परिस्थितीमध्ये जहाजावर उभ्या असलेल्या लुकअपना जहाजापासून काही अंतरावर एक मोठा हिमनग जहाजाच्या मार्गावर असल्याचे दिसले. त्यांनी लगेच सेकंड कॅप्टनला कळविले. हिमनग इतका जवळ होता आणि जहाज इतके प्रचंड होते की, जहाज थांबविणे शक्य नव्हते. म्हणून मग जहाज वळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्या प्रयत्नांमध्ये जहाजाने हिमनगाला धडक दिली. त्यानंतर पाच मिनिटांत जहाजाचे इंजिन बंद करण्यात आले. तरीदेखील हिमनगाचा खालचा भाग जहाजाच्या तळातील पट्ट्यांना घासला गेला आणि जहाजाच्या तळाला ठिकठिकाणी छोटी, मोठी छिद्रे पडली आणि जहाजामध्ये प्रचंड प्रमाणात पाणी भरायला लागले आणि टायटॅनिक जहाजाचे दोन तुकडे झाले.

## टायटॅनिकवरील लाकडापासून बनविलेले लाईफ जॅकेट्स

सुरुवात झाली, जहाजाच्या कॅप्टनने जवळपास असलेल्या जहाजांना S O S संदेश पाठविण्यास सुरुवात केली; परंतु जवळपास असलेल्या जहाजावरील रेडिओ ऑपरेटर झोपलेले असल्याने ते मदतीकरिता आले नाहीत. नंतर लाईफ बोट खाली उतरवण्यात आल्या जहाजांवर एकच गोंधळ माजला. अतिश्रीमंत फर्स्ट क्लासमधील स्त्रिया आणि मुले यांना प्रथम प्राधान्य देण्यात आले. लाईफ बोटींची क्षमता ६०-७० असताना केवळ ३० ४० बायका व मुलांसह बोटी खाली सोडण्यात आल्या. बोट चालवण्यास कोणी नव्हते, पुरेशी लाईफ जॅकेट्स नव्हती. थोड्याच वेळात जहाजाचा पाण्याने भरलेला भाग वाकडा होऊ लागला आणि अखेरीस जहाजाचे दोन तुकडे झाले. या सर्व घटनांचे अतिशय विदारक, मन खिन्न करणारे वर्णन प्रत्यक्ष टायटॅनिक जहाजावरील आवाजांचे रेकॉर्डिंग आणि जहाजाचे समुद्रतळाशी सापडलेले अवशेष यांच्या साहाय्याने शेवटच्या दालनात दर्शविण्यात आलेले आहे. या घटनेत ज्या प्रवाशांचा जीव वाचवण्यात आला त्यांचे कपडे, रक्ताने आणि मातीने माखलेली लाईफ जॅकेट इ. वस्तू बघून मन खूप उदास होते.


टायटॅनिक जहाजाच्या दुर्दैवी घटनेनंतर S O S संदेश, रेडिओ ऑपरेटिंग मशिन्स, लाईफ बोट, लाईफ जॅकेट इ. समुद्री प्रवासाच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाण बदल करण्यात आले. टायटॅनिक जहाज का बुडाले? याबाबत खूप संशोधने करण्यात आली. विविध कारणांचा शोध घेण्यात आला आणि अजूनही घेण्यात येत आहे. कारण मानवी इतिहासातील ही एक प्रचंड मोठी दुर्घटना आहे. इतिहासातील घटनेचे जसेच्या तसे दर्शन आपल्याला या म्युझिअममध्ये होते.

शिस्तबद्ध पद्धतीने, ऐतिहासिक गोष्टींचे जतन, संवर्धन करून त्या गोष्टी पुढच्या पिढीपर्यंत कल्पकतेने पोहोचवण्याची इंग्रजांची पद्धत वाखाणण्यासारखी आहे. याचा अनुभव हा म्युझियम बघताना आणि युकेमध्ये फिरत असताना पदोपदी येतो. इंग्रजांचे हे गुण आपणसुद्धा आत्मसात करायला हवे.

**(सहायक कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग.)**

# माझ्या पुस्तकप्रेमाची गोष्ट

**विलास कुडके**



'भेट म्हणून पुष्पगुच्छाऐवजी पुस्तक द्या' असे आज म्हटले जाते. भिलार येथे पुस्तकांचे गाव उभे राहिले आहे. एका पाश्चात्त्य शौकिनाने पुस्तकांचेच घर बांधले आहे. म्हणजे भिंतींमध्ये पुस्तकेच पुस्तके. पावसाच्या पहिल्या थेंबाने मातीला गंध यावा, तशा कोऱ्या पुस्तकांचा मोहवून टाकणारा गंध आवडणार नाही, असा माणूस विरळा आहे. पूर्वी न शिकलेली माणसंही 'किती बुकं शिकलास?' असे विचारून विद्वत्ता पडताळायचे. पूर्वीच्या सिनेमांमध्ये नायक नायिका धक्का लागून खाली पडलेली पुस्तके उचलून देता-देता आणि पुस्तकांची देवाणघेवाण करीत-करीत एकमेकांच्या प्रेमात पडायची. पुस्तकात लपवलेला फोटो चोरून काढून पाहायचे. पुस्तकात मिळालेला गुलाब जपून ठेवायचे. शाळेतील पोरं पिंपळाची पाने पुस्तकात ठेवून ती जाळीदार करायचे. अशी कितीतरी उदाहरणे आहेत.

आयुष्य म्हणजे एक पुस्तक आहे आणि एकेक पान पलटत जायचे आहे असे कितीतरी जणांना वाटत असते. एका शायरने फार सुंदर म्हटले आहे, 'समय मिलनेपर मुझे पढना जरुर हकीकत ऐ जिंदगी की मुकम्मल किताब हूँ मै.' अलीकडे वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचनासाठी स्टॉलवर मोफत वाचनासाठी उपलब्ध करून दिलेली पुस्तके वाचनप्रेमींनी अक्षरशः दसऱ्याचे सोने लुटावे तशी लुटून काखोटीला मारून नेली आणि दुपारपर्यंत केवळ रिकामे स्टॉल राहिले, तर असे हे पुस्तकप्रेम.

तसं पाहिलं तर पुस्तकांचे वेड सगळ्यांनाच नसते. फार थोडी शहाणी माणसे पुस्तकात रमताना दिसतात. बरीचशी शहाणी माणसं दिवाणखान्यात शोभून दिसतील, अशी महागडी पुस्तके नुसती गोळा करीत असतात. पुस्तके वाचणे, जमा करणे ही पुस्तकांसाठी बेचैन होणाऱ्या माणसांसाठी चैनीची गोष्ट असते.

अशा या पुस्तकाचा मला लळा लागला, तो आई बुधवारच्या बाजरासोबत सांड्यावरच्या श्री सप्तशृंगी देवीपुढील पेपरस्टॉलवरून हमखास विकत आणणाऱ्या 'चांदोबा' मासिकामुळे. आई स्वयंपाक घरात उतरत्या छपराखालील भिंतीतील गजांच्या खिडकीजवळ चांदोबा वाचायची. तेव्हा मला त्यातील अक्षरे अजिबात कळायची नाहीत; पण त्यातील रंगीबिरंगी चित्रांनी मी अगदी हरखून आईभोवती पिंगा घालत राहायचो. पाहू-पाहू म्हणून आईला वाचता-वाचता थांबवत राहायचो. आई मला नगरसूलला सकडे आजीकडे घेऊन जायची, तेव्हा तेथील छोट्या मातीच्या घरामध्ये कोनाड्यात दत्तुमामाचे 'मराठी वाचनमाला' पुस्तक मला खूप आवडायचे. मुखपृष्ठावर एक शाळा, मैदान, झाडाखाली एक मुलगा व एक मुलगी अभ्यास करत आहे, असे सुंदर चित्र माझ्या अगदी स्मरणात आहे. त्यातील चित्रे कृष्णधवल होती तरी ती पाहता-पाहता मी जणूकाही ती खरीच आहे, अशा कल्पनेत रंगून जायचो. चिंगीचा पराक्रम या धड्यात चिंगी रेल्वे डब्यात बुरखाधारीचा बुरखा वर करून पाहत मिशीवाल्या चोराला पकडून देते असे चित्र होते. वीर बापू गायधनी धड्यात आग लागलेल्या वाड्याचे चित्र होते. आजीचे घड्याळ कवितेत आजी सावली पाहून वेळेचा अंदाज घेत आहे, असे चित्र होते. डोंबाऱ्याचे चित्र होते. नंतर एका मुद्रणालयाच्या अंधाऱ्या खोलीत भरणाऱ्या बालवाडीत मी जायला लागलो तेव्हा अंकलिपी (अंकल्पी) त्यातील बाराखडी धडे गोष्टी यातील कृष्णधवल चित्रे मला खूप-खूप आवडायची. भाऊबिजेला भावाला ओवळणारी बहीण. तुळशी वृंदावनासमोर हात जोडून प्रार्थना करणारी मुलगी. बुडबुड घागरीमधील पाण्यातील मडक्यावर लटलटत उभी मांजर कितीतरी चित्रे. इयत्ता पहिलीत गेलो, तेव्हा मला आठवते, एका पावसाळी सायंकाळी मोठ्या दांडीच्या बंद ओल्या छत्रीला दारामागे ठेवून वडिलांनी 'मराठी वाचनमाला' पुस्तक माझ्यासाठी आणून 'बघ, तुझ्यासाठी काय आणले?' म्हणून माझ्यापुढे ठेवले तेव्हा मला किती आनंद झाला होता. नगरसूलला पाहिले अगदी तसेच पुस्तक पाहून मी अगदी हरखून गेलो. आईने मग स्वयंपाक घरातील चुलीजवळ ओट्यावर बसून एकेक धडा वाचून दाखवला. आई चौथी पास होती. मला तेव्हा कुठे वाचता येत होते; पण त्यातील चित्रांनी माझे मन आकर्षित करून घेतले होते.

तिसरीला असताना मोठीच गंमत झाली. लाटेवाड्यातील पहिलीच्या मुलांच्या हातात बालभारतीची रंगीत चित्रे असलेली पुस्तके आलेली होती आणि ती सगळीकडे दाखवत मुले उड्या मारत होती. तुझ्या पुस्तकात काळी चित्र अशीही चिडवत होती. पुढे बालभारतीच्या पुस्तकांनी मला त्यातील लेखक कवींची आणखी पुस्तके वाचण्यास उद्युक्त केले. मेजर साळवींच्या धड्यामुळे मी त्यांचे 'स्वाधीन की दैवाधीन' हे पुस्तक मिळवून वाचले आणि हरखून गेलो. मंगेश पाडगावकर सुरेश भट यांचे कितीतरी गजलसंग्रह मिळवून वाचले.

तेव्हा मी राहायचो ते घर पहिल्या मजल्यावर होते. स्वयंपाक घराला लागून मधली अंधारी खोली होती. त्या खोलीत दाराजवळ उंचावरील कोनाड्यात वडिलांची पुस्तके असायची. अनेकदा डब्यावर




डबे चढवून त्यावर मी चढून कोनाड्यापर्यंत हात न्यायचा प्रयत्न करायचो; पण काही केल्या हात पोहोचायचा नाही. त्या कोनाड्यात त्या काळातील कितीतरी पुस्तके होती. नाशिक डिरेक्टरी, परशुरामाच्या लावण्या, स्टुडंट इंग्लिश. त्याच दरम्यान कळले की, वाड्यातील मुले मारुती मंदिराजवळील टपरीवरून पाच पैशात गोष्टींची पुस्तके आणून वाचतात, तेव्हा मी पण आईकडे पाच-पाच पैशांचा हट्ट करून एकेक गोष्टींची छोटी-छोटी पुस्तके आणून वाचायला लागलो आणि मग गोष्टी वाचण्याचा छंदच लागला. कितीतरी गोष्टी होत्या. बुटका जादूगार, शापित राजकन्या, हिम गौरी आणि सात बुटके, सिंदबादच्या सफरी, कितीतरी. जादू, पऱ्या, राक्षस असं सगळं ते अद्भुत विश्व होते. भोईरवाड्यात मी खेळायला जायचो, तेव्हा वृंदा मावशीच्या हातात सुमती पायगावकरांनी मराठीत १६ भागांमध्ये संपादित केलेल्या हंस अंडरसनच्या परिकथा माझ्या पाहण्यात आल्या होत्या. श्रीराम विद्यालयात पाचवी सहावीला असताना गोष्टी सांगायच्या स्पर्धेत मला आठवते बक्षीस म्हणून पुस्तकच मिळाले होते. सरदार चौकात वाचनालय आहे. तिथे मी सुरुवातीला वृत्तपत्रे वाचण्याच्या निमित्ताने जाऊ लागलो. तेथील घाऱ्या डोळ्यांच्या व शरीराने किडकिडीत असलेल्या ग्रंथपालाने एक दिवस मला बोलावून 'तुला वाचण्याची आवड आहे का?' म्हणून विचारले. मी मान डोलावली. तेव्हा त्याने तेथील कपाटातून एकेक पुस्तक घेऊन तिथल्या तिथे वाचायची परवानगी दिली. ते ग्रंथपाल माझ्या नेहमी स्मरणात राहतील. कारण त्यांनीच पुस्तकांचा खजिना माझ्यासाठी उघडून दिला. मला किती वाचू अन् किती नाही असे झाले. मी त्या ग्रंथालयाचा सदस्य झालो. वर्गणी माफक होती. मी एकेक पुस्तक घरी घेऊन यायचो. त्यामध्ये अनुवादित विज्ञान कथा, स्वामी विवेकानंद यांचे खंड असायचे. वाचून त्याचे टिपण मी वहीत घ्यायचो. नगरसूलला 'विज्ञान परिचय' हे पुस्तक त्याच दरम्यान माझ्या पाहण्यात आलेले होते. त्यामुळे विज्ञान शास्त्रज्ञ शोधकथा यावर माझा भर असायचा. एकदा Complete Shakespeare या पुस्तकाने इतकी मोहिनी घातली की, त्याच्या बदल्यात मी ग्रंथालयास माझ्याजवळील '१०८ उपनिषिदे' हे पुस्तक देऊन ते मिळवले. नियमात तसे नव्हते, तरी माझे पुस्तक प्रेम पाहून ग्रंथपालाने मला आनंदाने तो ग्रंथ दिला.

हळूहळू माझ्या वाचनाच्या भौगोलिक कक्षा रुंदावल्या. सरदार चौकातील वाचनालय मला लहान वाटू लागले म्हणून की काय मी गोदावरी पलीकडे सार्वजनिक वाचनालयाचा सदस्य झालो. तिथे तर विषयवार पुस्तकांचे इतके भांडार होते की, मोठा खजिनाच हाती यावा, तसे मला झाले. माझे वाचनाचे प्रेम पाहून मला थेट आत कपाटांच्या रांगांमध्ये जाऊन पुस्तक शोधून आणण्याची परवानगी मिळाली. मग काय, ज्या कपाटांकडे फारसे कोणी फिरकत नसायचे, त्या-त्या कपाटातील पुस्तकांवरील धूळ झटकून मी एकेक पुस्तक निवडून वाचू लागलो. साहित्याचे मोठे दालनच माझ्यासाठी खुले झाले. माझ्या वाचनालयाच्या फेऱ्या वाढल्या. चुकला फकीर मशिदीत तसा मी वाचनालयात सापडू लागलो. मधल्या होळीत एक वाचनालय होते. तेथेही मी जाऊ लागलो. एके दिवशी हेमलता टॉकीजला सिनेमा पाहायला गेलो, तेव्हा तेथे जवळच ग्रंथालयाचा शोध लागला.

तिथेही मी सदस्य झालो. एकदा 'रसचिंतामणी' नावाचा जुना ग्रंथ मी तेथून घरी आणला. रोग आणि त्यावरील आयुर्वेदिक औषधावरील श्लोकबद्ध ग्रंथ मी अक्षरशः एका वहीत उतरवून घेतला. अशा प्रकारे सार्वजनिक वाचनालयातून आणलेल्या Fairy tales मी वहीत सुंदर कोरीव अक्षरात उतरवून घेतल्या होत्या, तर रसचिंतामणी उतरवता

–उतरवता ग्रंथपाल माझा पत्ता शोधत–शोधत घरी आला. तेव्हा मी लाटे वाड्यात राहायचो. तो काकुळतीला येऊन म्हणाला, ’ग्रंथालयाबाहेर देता येत नाही, असा ग्रंथ मी तुम्हाला चुकून दिला, तो ताबडतोब द्या, नाहीतर माझी नोकरी जाईल.’ त्याची ती अवस्था पाहून मी तो ग्रंथ लगेच परत केला.

दहावीला असताना मराठीच्या लवेकर बाईंनी एकदा वि. स. खांडेकर अत्यवस्थ असल्याचे डोळ्यात पाणी आणून सांगितले. मागील वर्षीच त्यांच्या ययाती कादंबरीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला होता. मी लगेच वाचनालयातून वि. स. खांडेकर यांची एकेक पुस्तके आणून वाचली. श्रीकांत सिनकरांच्या पोलिसी चातुर्य कथा, द. मा. मिरासदार यांच्या विनोदी कथा, शेरलॉक होम्सच्या गुप्तहेर कथा, सोळा खंडातील अरेबियन नाईट्स, स्वामी, झुंज, शहेनशाह, श्रीमान योगी अशा कितीतरी पुस्तकांनी माझ्यावर भुरळ घातली. बहुधा मी राहत असलेल्या वाड्यात, गल्लीत हातात नेहमी पुस्तक असलेला केवळ मीच असावा. एकाच खोलीत कॉट, चूल होती. कॉटला लागूनच आईच्या काळातील पितळी भांड्यांची रॅक मी पुस्तकांसाठी ठोकून ठेवली होती. त्या काळात रघुवीर जादूगार प्रसिद्ध होते. त्यांच्या जादूची पुस्तकेसुद्धा मी हौशीने घेतली. त्यांच्या ‘प्रवासी जादूगार’ पुस्तकाने तर मला आणखी प्रवास वर्णन वाचायला प्रेरित केले.



दहावीनंतर अकरावी विज्ञानला काही महिने महाविद्यालयात गेलो, नंतर शिक्षण सोडून मेनरोडला रेडिमेड कपड्यांच्या दुकानात कामाला लागलो. तेव्हा पगार अगदी तुटपुंजा होता. असे असले तरी कुठे पुस्तक प्रदर्शन असले की, मी पाच रुपयांपर्यंतची पुस्तके घ्यायचोच घ्यायचो. ग्रेस यांच्या ‘संध्याकाळच्या कविता’, ना. धों. महानोर यांच्या ‘रानातल्या कविता’, नारायण सुर्वे यांचा ‘जाहीरनामा’ असे तेव्हा प्रकाशित काव्यसंग्रह मी घेतले होते. अशाच प्रदर्शनात एकदा मला ‘विश्वकोश’ दिसले. एकेक खंडाची किंमत १०० रुपये होती. दरमहा एक याप्रमाणे मी पैसे साठवून ९ खंड घरी आणले. माझ्या घरातील पुस्तकांची रॅक हळूहळू पुस्तकांनी भरू लागलेली होती. गावाकडची मंडळी घरी आली की, मी तेव्हा कुठले ना कुठले पुस्तक वाचत बसलेला असायचो. तेव्हा ती मंडळी माझ्याकडे अशी काही पाहायची की, जणू काही पुस्तक वाचून काही उपयोग नाही. पुस्तकांचा नाद म्हणजे वेड्या माणसांचे काम असेच ती त्यांच्या पाहण्यातून सुचवायची. पुस्तकांचे वेड काही कामाचे नाही, असा व्यवहारिक सल्लाही मग मिळायचा. एवढ्याने माझे पुस्तक प्रेम काही कमी झाले नाही. मेनरोडवरून कामावरून परतण्याचा माझा मार्ग रामसेतूवरून असायचा. भांडी बाजारात माझा मित्र विजय सातपुते राहायचा. तोही माझ्यासारखाच पुस्तकप्रेमी. रशियन पुस्तकांच्या प्रदर्शनात मी आणि त्याने डोटोवस्की, अलेक्झांडर पुश्किन लिओ टॉलस्टाय यांची कितीतरी पुस्तके ‘अ‍ॅना करीना’, पुनरुत्थान, गुलाबी आयाळीचा घोडा’ इत्यादी अगदी स्वस्तात म्हणजे १०–१२ रुपयात म्हणून घेतली होती. भांडी बाजारातच एक दुकान होते. तिथे रस्त्यावर नेहमी जुनी पुस्तके मांडून ठेवलेली असायची. तिथे मी नेहमी घुटमळायचो. जुन्या पुस्तकांवरील मूळ किंमत खोडून वाढीव किमतीत ती विकत असे. रामसेतूवरून नारोशंकराच्या मंदिराजवळ आले की, तिथे एक ’प्रेमनगर पुस्तकालय’ होते. तिथे हिंदी धार्मिक तंत्र–मंत्राची पुस्तके असायची. आध्यात्मिक पुस्तके वाचण्याचा छंद त्यामुळेच लागला. एकदा असाच मेनरोडवरून घरी जात होतो, तेव्हा ज्योती स्टोअर्सच्या शोकेसमध्ये ’पु. ल. एक साठवण’ पुस्तकाची प्रकाशनपूर्व सवलतीची आकर्षक जाहिरात पाहिली आणि मग पैसे साठवून मुदतीत भरुन नोंदणी केली.

पु. ल वाचताना पी जी वुडहाऊसची गोडी लागली. शनीचौकात एका पुस्तकाच्या दुकानात मला पी. जी. वुडहाऊस आणखी भेटला. लग्न झाले तरी पुस्तकप्रेम काही कमी झाले नाही. पंचवटीतून उपनगरला राहायला गेलो. तिथेही छोट्याशा खोलीत त्याच रॅकमध्ये पुस्तकांचा संसार मांडलेला होता.

आईने २० रुपयात घेतलेले एक लाकडी कपाट होते. रॅक फुल झाल्याने लाकडी कपाटातही पुस्तकांनी अधिक्रमण केलेले होते. कपाटाच्या जाळीतून बघणाऱ्याला अंदाज येत होता की, आत पुस्तकेच पुस्तके आहेत. Grim brothers fairy tales चे हिरवे बाईंडगचे पुस्तक जाळीतून डोकवायचे. एक मेव्हणी पुस्तकप्रेमी. घरी आली की, हक्काने जिजाजी–जिजाजी करत एकेक पुस्तक घेऊन जायची. ती माझी वाचून झालेली असायची. त्यामुळे परत नाही आली तरी मला त्याचे काही वाटायचे नाही. एक मेव्हणाही असाच पुस्तकप्रेमी. त्याने पु. ल. साठवण नेले. रॅकमध्ये अशाप्रकारे कमी झालेल्या पुस्तकांची जागा नवीन पुस्तके घेई. एकदा शासकीय रुग्णालयाजवळ रस्त्यावर पुस्तके मांडलेली होती. त्यात पॅपिलान शेरलॉक होम्सच्या चातुर्य कथा सहा भाग, सिडने शेल्डान याच्या कादंबऱ्या पाहायला मिळाल्या. ही पुस्तके मी एकेक करून घेतली.

संसारात राहून पुस्तकप्रेम जपणे तसे परवडण्यासारखे नसते. पुस्तके ही काही संसारोपयोगी गोष्ट नाही. तुटपुंज्या उत्पन्नात ही हौस भागवणे अवघड असते; पण एखादे पुस्तक संग्रहात असलेच पाहिजे,

असे जेव्हा वाटे, तेव्हाच मी पुस्तक घेई. काही वेळा आधी विचारले, तर महागड्या किमतीमुळे पुस्तक घ्यायला घरून रुकार मिळेलच अशी खात्री नसायची. नंतर-नंतर पुस्तकांच्याही किमती वाढत गेल्या. अगदी आवडलेच तर पुस्तक घ्यायचे असे मी ठरवले. वसंत कानेटकरांची अश्रुंची झाली फुले, वेड्याचे घर उन्हात अशी काही नाटके, हेनरीक इब्सेनची नाटके, कुसुमाग्रजांचे प्रवासी पक्षी, छंदोमयी इ. कविता संग्रह, श्रीपाद कृष्ण कोल्हाटकरांचे सुदाम्याचे पोहे, पर्सी बी शेले यांचा कवितासंग्रह, समग्र गडकरी, समग्र बालकवी, रवींद्रनाथांचे वाङ्मय, ॲन्टॅन चेखेव मोपासा यांच्या कथा अशी कितीतरी पुस्तके माझ्या संग्रहात जमली. आपल्या काळातील बालभारतीची पुस्तके मी शोध घेऊन महर्षी शिंदे अध्यापक विद्यालयातून मिळवली. त्या आधीच्या मराठी वाचनमालेचे दुसरे पुस्तक सासुबाईंनी त्यांच्या शाळेतून मिळवून दिलेले होते. तर याच मालिकेतील अक्षरशः वाळवीग्रस्त एक पुस्तक सुट्टीच्या दिवशी कसारा येथील श्री. लोखंडे यांच्याकडून मिळवले होते. नवयुग वाचनमाला अशीच मी प्रकाशकाशी पत्रव्यवहार करुन मागवली होती.



मुंबईला सेवेत लागल्यावर मला नाशिकमधील सार्वजनिक वाचनालयात जाता येईना. हळूहळू ते माझ्यासाठी दुरापास्तच झाले. मग मी मंत्रालय केंद्रीय ग्रंथालयात जाऊ लागलो. जवळच सचिवालय जिमखान्यातील ग्रंथालयाचा सदस्य झालो. कामानिमित्त गोव्याला गेलो तेव्हा तेथील कार्यालयात मला मेजर साळवींचे 'स्वाधीन की दैवाधीन' हे पुस्तक मिळाले. नवी दिल्लीला कामानिमित्त गेलो, तेव्हा जवळच साहित्य अकादमीतून रवींद्रनाथ टागोर यांचे वाङ्मय घेऊन आलो. एका वाढदिवसाला मी गुच्छऐवजी पुस्तक द्या म्हटले, तर सहकाऱ्यांनी ग्रेसचा कवितासंग्रह भेट म्हणून दिला.

मध्यंतरी रिडर्स डायजेस्टकडून आकर्षक गाडी जिंका म्हणून जाहिरात आली. त्यात अनेक इंग्रजी पुस्तके घरात आली. गाडी काही आली नाही. धार्मिक पोथ्या पुस्तकांचीही भर पडत गेली. एक लोखंडी कपाट भरून पुस्तके झाली आहेत. जागेअभावी बरीचशी पुस्तके लाफ्टवर रॅकवरच आहेत. संग्रहातील पुस्तके जपणे हे मोठे आवश्यक काम असते. बरीचशी पुस्तके बाजारात बाहेर मिळत नाही, अशी दुर्मीळ झालेली आहेत. या पुस्तकांसाठी काचेची दरवाजे असलेली मांडणी करून घ्यावे, असे माझे किती दिवसांचे स्वप्न आहे ते कधी पूर्ण होईल, कुणास ठाऊक.

आजही मला कुठे पुस्तक प्रदर्शन दिसले की, माझी पावले तिकडे वळतातच. चर्नीरोडला सुंदराबाई हॉलमध्ये अशी प्रदर्शने मधून-मधून भरतच असतात. तेथे मध्यंतरी अजब पुस्तकालयाने कोणतेही पुस्तक ५० रुपयांत म्हणून प्रदर्शन भरवले होते. तेथून मी कितीतरी पुस्तके खरेदी केली होती.

बरीचशी पुस्तके दुर्मीळ होतात, तेव्हा आपल्याला माहीत होतात. 'मीनाकुमारी की शायरी' हे असेच एक पुस्तक. कुठेच मिळेना. ते मला मंत्रालयात उपसचिव सुरेश कळसकर यांनी वाचायला दिले. ऑनलाइन दुर्मीळ पुस्तके शोधली तर खूप मिळतात. अगदी १८व्या, १९व्या, २०व्या शतकातील पुस्तके डाऊनलोड करता येतात. जुन्या पुस्तकांचे डिजिटलायझेशन करून त्यांचे जतन करण्याचे आजकाल सर्वत्र प्रयत्न सुरू आहेत. मुद्रित पुस्तकांच्या तुलनेत ई-बुक्स स्वस्तात उपलब्ध होत आहेत. पुस्तकांचे जगत अफाट आहे. वाचलेल्या पुस्तकांच्या तुलनेत न वाचलेली पुस्तकेच अधिक आहेत आणि दिवसेंदिवस त्यात नव्याने भर पडतच आहे. कोणे एकेकाळी मी माझा या चारोळी संग्रहातील चारोळ्या मी वहीत उतरवल्या होत्या. वि. स. खांडेकर यांच्या पुस्तकातील सुंदर वाक्ये उतरवली होती. अलीकडेच मी ऑनलाइन जॉन एलिया यांचे दोन गझल संग्रह, विकास शुक्ला यांनी मराठीत अनुवादित केलेल्या मोपासा यांच्या कथा, वि. स. खांडेकर यांचे 'सहा भाषणे' आणि ना. सी. फडके यांचे गुजगोष्टी मागविले. आता नाशिकमध्ये पुन्हा नव्याने सदस्य होऊन 'मास्तरांची सावली' हे पहिले पुस्तक वाचावयास आणले आहे. या सार्वजनिक वाचनालयात पुस्तक प्रदर्शने भरत असतात. पाऊले नकळत तिकडे वळतच राहतात. काही पुस्तके खरेदी करण्याचा खूप मोह होतो. वि. स. खांडेकर यांची मध्यंतरी आऊट ऑफ प्रिंट झालेली मंझधार, धुके ही लघुनिबंधाची पुस्तके व चंद्रशेखर गोखले यांचा 'मी माझा' हा चारोळी संग्रह मला दिसताच मी खरेदी केली. घरी ती पुस्तके हळूच इतर पुस्तकात बेमालूमपणे विराजमान झाली तेव्हा निःश्वास सोडला; पण हे चोरटे पुस्तकप्रेम बिलाचा कागद घरच्यांच्या हातात लागल्यावर शेवटी उघडकीस आलेच. पुस्तकांचे प्रेमच असे आहे की, ते जराही कमी होत नाही. वाढतच राहते. फक्त हे प्रेम स्वतः पुस्तके मिळवून करावे. आपल्या संग्रहातील पुस्तक कोणी मागितले, तर पुस्तकप्रेमी कोणालाही काळजाचा तुकडा मागितल्यासारखेच वाटेल, यात काही शंका नाही.

**(निवृत्त वरिष्ठ सहायक संचालक, महाराष्ट्र शासन.)**

# नव्या आशेच्या दिशेने...

**श्रद्धा मेश्राम**

*समस्याग्रस्त व गरजू महिलांना समाजात पुन्हा जगता यावे, यासाठी महिला व बालविकास विभाग सक्रिय कार्यरत...*

राज्यातील बालके ही राष्ट्राची भावी पिढी असून, त्यांच्या सर्वांगीण विकासावरच देशाच्या प्रगतीचा पाया दृढ होतो. तसेच महिलांच्या प्रगतीच्या आलेखावरून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र उमटते. राज्यातील प्रत्येक घटकातील महिला व बालकांच्या संरक्षणासाठी, सक्षमीकरणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी व पुनर्वसनात्मक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या समस्याग्रस्त व गरजू महिलांना सामाजिक सुरक्षा, मानसिक आधार, रोजगाराच्या संधी; तसेच शिक्षणाद्वारे आर्थिक स्वावलंबन मिळावे, यासाठी महिला व बालविकास विभाग सातत्याने कार्यरत आहे. यासाठी राज्यभरात महिला सुधारगृहे, बाल सुधारगृहे व नवजीवन महिला वसतिगृहे यांसारख्या संस्थांद्वारे पुनर्वसन व सक्षमीकरणाची प्रक्रिया राबविण्यात येते.

मुंबई महानगर क्षेत्रात विविध राज्यांमधून व देशाच्या इतर भागांमधून रोजगार किंवा व्यवसायाच्या संधीसाठी येणाऱ्या महिलांची काही वेळा फसवणूक होऊन त्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या जाळ्यात सापडतात. अशा महिलांना पुन्हा सन्मानपूर्वक समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी महिला व बालविकास आणि कल्याण समिती कार्यरत आहे. या समितीत एकूण १६ सदस्य असून, आमदार मोनिका राजळे या समितीच्या अध्यक्षा आहेत.

अलीकडेच समितीमार्फत मुंबई जिल्ह्याचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यात समिती सदस्यांनी भायखळा महिला कारागृह, शताब्दी रुग्णालय, बाल सुधारगृह, शासकीय नवजीवन महिला वसतिगृह, शहाजीनगर प्रसूतिगृह; तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट देऊन तेथील सुविधा आणि स्थितीचा आढावा घेतला.

दौऱ्यादरम्यान आमदार सना मलिक, सीमा हिरे, महेश सावंत, ज्योती गायकवाड, श्रीजया चव्हाण, चित्रा वाघ, स्नेहा दुबे, प्रज्ञा सावंत, सुनील शिंदे, रंजना जाधव, मनीषा कायंदे; तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार, उपायुक्त सुवर्णा पवार, ठाणे जिल्ह्याच्या महिला व बालविकास अधिकारी नमिता शिंदे, नोडल अधिकारी प्रेमा घाटगे आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

महिला कारागृहात बंदिवान महिलांसाठी निवासाच्या योग्य सुविधा, प्रथिनयुक्त आहार, स्वच्छता, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा आणि त्यांच्या लहान मुलांसाठी विशेष वैद्यकीय व पोषण सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कारागृह परिसरात महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत २५ बालकांसाठी अंगणवाडी कार्यरत असून लहान मुलांसाठी सकस आहार व शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.

महिला बंद्यांसाठी आर्ट ऑफ लिव्हिंग, जीवन विद्या मिशन, शिलाई, चित्रकला, ब्युटी पार्लर, नर्सिंग, डिजिटल फोटोग्राफी यांसारखे व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच साक्षरता अभियान, ग्रंथालय व अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांद्वारे मानसिक व सामाजिक पुनर्वसनास चालना दिली जाते.

शताब्दी रुग्णालयाच्या अखत्यारीत सुमारे १५ लाख लोकसंख्येला माध्यमिक आरोग्य सेवा पुरविण्यात येते. येथे राज्य व केंद्र शासनाच्या जननी सुरक्षा योजना, आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, मातृवंदना योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुख्यमंत्री आरोग्य सेवा योजना इत्यादी विविध योजना राबविण्यात येत आहेत. शहाजीनगर प्राथमिक आरोग्य केंद्र व शताब्दी रुग्णालयांमधील आरोग्य कर्मचारी यांना रुग्णांशी सौजन्यपूर्ण वर्तणुकीचे प्रशिक्षण दिले जाते.

मुंबई शहरातील झोपडपट्टी व झोपडपट्टीबाहेरील परिसरातील महिलांसाठी आरोग्यविषयक १६ रुग्णालये, २७ प्रसूतिगृहे, ३३ पॉलिक्लिनिक व २३६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत स्वस्थ नारी – सशक्त नारी अभियानांतर्गत विविध आरोग्यवर्धक सेवा दिल्या जात आहेत. आतापर्यंत १.५ लाख बालकांची ६० हजार कॅम्पद्वारे मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांना संरक्षण व समुपदेशन देण्यासाठी १२ 'दिलासा केंद्रे' कार्यरत आहेत. शासकीय नवजीवन महिला वसतिगृह आणि बाल सुधारगृह या संस्थांमार्फत समस्याग्रस्त व गरजू महिलांना आश्रय, संरक्षण आणि पुनर्वसनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ अन्वये कार्यरत या संस्थेत न्यायालयाच्या आदेशानुसार अथवा पोलीस खात्याकडून दाखल झालेल्या १८ वर्षांवरील महिलांना २१ दिवसांच्या कालावधीत निवास व पुनर्वसन सुविधा दिल्या जातात.

संस्थेमध्ये दयानंद फाऊंडेशन, सवेरा, सेव्ह द चिल्ड्रन इंडिया, प्रयास, क्षमता, प्रेरणा आदी स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने शिवणकाम, विणकाम, भरतकाम, ब्युटी पार्लर, औपचारिक शिक्षण, कला वर्ग व साक्षरता अभियान या माध्यमातून महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. जानेवारी २०२५ ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान एकूण ६२३ प्रवेशिता संस्थेत दाखल झाल्या असून ऑक्टोबर अखेर ११८ महिला वसतिगृहात आहेत. लहान मुलांसह प्रवेशित महिलांच्या मुलांचीदेखील येथे योग्य प्रकारे काळजी घेतली जाते.

महिला व बालविकास विभागामार्फत समस्याग्रस्त महिला व बालकांना पुनर्वसनाच्या माध्यमातून सन्माननीय जीवन जगता यावे, स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करता यावी, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. कु. आदिती तटकरे, मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. अनुपकुमार यादव, सचिव यांच्या नेतृत्वाखाली विभागाच्या विविध योजनांद्वारे महिलांच्या सक्षमीकरण व पुनर्वसनासाठी ठोस आणि सकारात्मक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

# विजयनगर – हम्पी











(सर्व छायाचित्रे : अजय भोसले, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)




## बहिणाबाई चौधरी कविता




## संस्कृत सुभाषित

***नष्टं द्रव्यं लभ्यते कष्टसाध्यम्,***
***नष्टा विद्या लभ्यतेऽभ्यासयुक्ता ।***
***नष्टा रोग्यं सूपचारैः सुसाध्यम्,***
***नष्टा वेला या गता सा गतैव ।।***

आपण धन, विद्या, आरोग्य हरवले तरी काही प्रमाणात परत मिळवू शकतो; पण वेळ कधीच परत येत नाही. म्हणून वेळेचा सदुपयोग करा, कारण तीच सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. धन नाहीसे झाले, तर ते कष्टाने साध्य करून पुन्हा मिळते. नाहीशी झालेली (म्हणजे विसरलेली) विद्या अभ्यासाची जोड दिली असता (पुन्हा) प्राप्त होते; नाहीसे झालेले आरोग्य चांगल्या उपाययोजनांनी चांगले साध्य होते; (परंतु) जी वेळ नाहीशी झाली, निघून गेली ती गेलीच, म्हणून वेळेचा सदुपयोग करावा.

***जे ज्ञानगंगे नाहाले। पूर्णता जेउनि धाले ।***
***जे शांतीसि आले। पालव नवे ।।***

ज्ञानाच्या गंगेत एकदा का स्नान केले, हे अपूर्व अध्यात्म ज्ञान एकदा का आत्मसात केले की काय आश्चर्य घडते, तर पूर्णत्वाकडे नेणारे अमृत-भोजन घडते. जीव तृप्त होतो. त्याचा दृश्यपरिणाम काय, तर कशानेही न ढळणारी असीम शांती माणूस प्रत्यक्षात अनुभवू लागतो.

# म्हणजे काय?

## कलगीतुरा




कलगीतुरा ही महाराष्ट्रातील एक लोककला आहे, जी शाहिरी लावण्यांच्या रूपात सादर केली जाते. या कलाप्रकारात 'कलगी' आणि 'तुरा' हे दोन गट असतात, जे एकमेकांना आध्यात्मिक लावणी आणि कूटप्रश्नांद्वारे आव्हान देतात. 'कलगी' म्हणजे शक्ती आणि 'तुरा' म्हणजे शिव, या दोन संकल्पनांमधील श्रेष्ठत्वाचा वाद या लावण्यांमधून मांडला जातो.

### कलगीतुराबद्दल माहिती

**स्वरूप :** हा लोककलेचा एक प्रकार आहे. ज्यामध्ये शाहिरी लावण्या सादर केल्या जातात.

**गाभा :** यात प्रामुख्याने आध्यात्मिक लावणीचा समावेश असतो, जिथे दोन गट 'कलगीवाले' आणि 'तुरेवाले' म्हणून भाग घेतात.

**वादविवाद :** या लावणीच्या माध्यमातून 'शिव श्रेष्ठ की शक्ती श्रेष्ठ' यासारखे प्रश्न विचारले जातात आणि त्यांची उत्तरे शोधली जातात.

**भाषा आणि बोली :** हा कलाप्रकार महाराष्ट्रातील विविध प्रांतांच्या बोलीभाषा आणि लहेजातून सादर केला जातो.

**प्रेक्षक :** गावागावांमध्ये शेतकरी आणि बहुजन समाज या कलाप्रकाराचा आस्वाद घेतो.

---

## मावळ

नदी डोंगरातून खाली उतरल्यानंतर तिच्या परिसरात तयार होणाऱ्या विस्तीर्ण प्रदेशाला 'मावळ' असे संबोधले जाते. अर्वाचीन मराठीत या भूरचनेला प्रामुख्याने खोरे, दरा (पर्वतामधील मोठे खोरे) किंवा दरी (लहान दरा) अशी संज्ञा प्रचलित आहे.

सह्याद्री पर्वतरांगांच्या दोन शाखांदरम्यान निर्माण होणाऱ्या खोऱ्यांना ऐतिहासिकदृष्ट्या मावळ असे नाव दिले गेले आहे. विशेषतः पुणे जिल्ह्याच्या अधोभागात अशा स्वरूपाचे एकूण बारा प्रमुख मावळ प्रांत आढळतात. या प्रत्येक मावळाचा भौगोलिक विस्तार, जलस्रोतांची रचना, कृषिसंस्कृती; तसेच स्थानिक लोकजीवन या घटकांच्या आधारे विशिष्ट असा आकार आणि ओळख निर्माण झाली आहे.



काही ऐतिहासिक संदर्भात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यातील मावळे या शब्दांचा उल्लेख आढळतो. याबाबत असेही कथन केले जाते की, शिवकालीन सैन्यात भरती झालेल्या सैनिकांची निवड पुणे जिल्ह्यातील या मावळ प्रदेशातून होत असे; त्यामुळे त्या प्रदेशाला मावळ प्रांत असे संबोधले जाई. तथापि उपलब्ध दस्तऐवजीकरणातून ही व्याख्या शास्त्रीयरीत्या सिद्ध होत नाही.

याचप्रमाणे पश्चिमेकडील दिशेस सूर्यास्त होत असल्यामुळे या प्रदेशाला मावळ हे नाव देण्यात आले, अशी लोकमान्यता काही ठिकाणी आढळते, परंतु यालाही ऐतिहासिक आधार नाही. प्रत्यक्षात, या प्रदेशाचा विस्तीर्ण भौगोलिक विस्तार लक्षात घेता त्याचे बारा मावळ असे प्रशासकीय स्वरूपात विभाजन करण्यात आले, हे अधिक विश्वसनीय व ऐतिहासिकदृष्ट्या स्वीकारार्ह मानले जाते.

थोडक्यात मावळ ही संज्ञा भौगोलिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अशा सर्व पैलूंशी निगडित असून सह्याद्रीच्या भूरचनेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून ती इतिहासात नोंदली गेलेली आहे.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# अभिजात मराठी

सर्व आकाशवाणी केंद्रांवर
मराठी भाषा विभागामार्फत
प्रायोजित कार्यक्रम


# अभिजात मराठी आपली मराठी

**दिनांक ३० मार्च, २०२५ पासून दर रविवारी,
सकाळी ७.२५ वाजता**


**ऐकायला विसरू नका !**


**अभिजात मराठी : आपली मराठी**


# लिहिते व्हा... आपलं मंत्रालय





माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई-मेलवर पाठवावेत.









## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ई-मेल : **aaplemantralay@gmail.com**

**Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR**

**Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR**